दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | सोमवार , दि. ९ मार्च, २०२६ | वर्ष - १ | अंक - १६३ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


### आजचे पंचांग

सोमवार दि. ९ मार्च २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर,
युगाब्द ५१२७, शालिवाहन शक १९४७, विक्रम संवत
२०८२, विश्वावसुनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु,
फाल्गुन मास, कृष्णपक्ष, षष्ठी रात्री ११-२८ पर्यंत, दिवस
नक्षत्र- विशाखा संध्याकाळी ४-१२ पर्यंत योग- व्याघात
सकाळी ७-३६ पर्यंत
चंद्र रास- सकाळी ९-३० पर्यंत
सूर्य रास = कुंभ, गुरु रास= मिथुन

### बांगलादेशी ताब्यात


**पुणे** : शहरातील बुधवार पेठ परिसरात अनधिकृतपणे वास्तव्यास असलेल्या बांगलादेशी नागरिकांवर फरासखाना पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. छापा टाकून ४ बांगलादेशी महिला आणि १ पुरुष यांना ताब्यात घेण्यात आले असून, या महिलांना वेश्याव्यवसायासाठी भाग पाडणाऱ्या एका दलालाला अटक करण्यात आली आहे. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी अवैधरित्या राहणाऱ्या बांगलादेशी नागरिकांचा शोध घेऊन त्यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश दिले होते.

## सारांश वृत्त

### राजौरीमध्ये ड्रग्ज तस्कराला अटक

**जम्मू** : जम्मू आणि काश्मीरच्या राजौरी जिल्ह्यात एका कुख्यात ड्रग्ज तस्कराला कडक प्रतिबंधक अंमली पदार्थ आणि सायकोट्रॉपिक पदार्थांच्या अवैध वाहतुकीच्या (पीआयटी-एनडीपीएस) कायद्यांतर्गत ताब्यात घेण्यात आले, अशी माहिती पोलिसांनी दिली. पोलिस प्रवक्त्याने सांगितले की, थानमंडीच्या भांगई गावातील जावेद इक्बाल तास हा ड्रग्ज तस्करीच्या अनेक प्रकरणांमध्ये सहभागी होता आणि पीआयटी-एनडीपीएस कायद्यांतर्गत त्याला अटक करणे हे ड्रग्जचा प्रसार रोखण्यासाठी आणि तरुणांचे रक्षण करण्याच्या प्रयत्नांचा एक भाग होता.

### ज्येष्ठ पत्रकार रामास्वामी यांचे निधन



**चेन्नई** : ज्येष्ठ पत्रकार आणि एस रामास्वामी यांचे रविवारी येथे निधन झाले, असे कुटुंबीय सूत्रांनी सांगितले. रामास्वामी (७४) यांच्या पश्चात पत्नी आणि मुलगी असा परिवार आहे. वयाशी संबंधित समस्यांमुळे त्यांचे निधन झाले.

### ममता बॅनर्जींच्या राजीनाम्याची मागणी



**कोलकाता:** भाजप खासदार खगेन मुर्मू यांनी रविवारी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या राजीनाम्याची मागणी केली आणि म्हटले की त्यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा अपमान केला आहे. शनिवारी सिलीगुडीजवळील त्यांच्या कार्यक्रमाचे ठिकाण बदलल्याबद्दल आणि मुख्यमंत्री किंवा कोणताही वरिष्ठ कॅबिनेट मंत्री उपस्थित नसल्याबद्दल राष्ट्रपतींनी नाराजी व्यक्त केली. "आदिवासींच्या प्रतिष्ठेचे रक्षण करण्यासाठी, मुख्यमंत्र्यांनी तात्काळ राजीनामा द्यावा," असे त्यांनी म्हटले आहे.

### भारतात एलपीजी, सीएनजीचा तुटवडा, गॅस सिलिंडरचाही भडका

# अमेरिकेच्या आततायीपणाच्या सामान्यांना झळा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** :इस्रायल आणि अमेरिकेने इराणवर केलेल्या हल्ल्यानंतर मध्यपूर्वेत पेटलेल्या युद्धाची झळ आता भारतालाही बसू लागली आहे. गेल्या ७ दिवसांपासून सुरू असलेल्या संघर्षामुळे एलपीजी आणि सीएनजीच्या पुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली असून त्याच पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने घरगुती गॅस सिलिंडरच्या दरात ६० रुपयांची तर व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या किमतीत ११५ रुपयांची वाढ जाहीर केली आहे. आजपासून नवे दर लागू झाल्याने सामान्य ग्राहकांना महागाईची अतिरिक्त झळ सोसावी लागणार आहे.



दरम्यान, युद्धजन्य परिस्थिती लक्षात घेता केंद्र सरकारने खबरदारीचा उपाय म्हणून व्यावसायिक वापरासाठीच्या एलपीजी सिलिंडरचा पुरवठा तात्पुरता थांबवण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे देशभरातील हॉटेल, रेस्टॉरंट, फूड इंडस्ट्री आणि इतर अनेक उद्योगांवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. व्यावसायिक गॅसचा पुरवठा कमी झाल्यास अनेक छोटे-मोठे व्यवसाय ठप्प होण्याची भीती उद्योग क्षेत्रातून व्यक्त होत आहे.

अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यातील संघर्ष दिवसागणिक तीव्र होत असून त्याचे परिणाम प्रत्यक्ष युद्धात सहभागी नसलेल्या देशांनाही सोसावे लागत आहेत. या युद्धामुळे जगासमोर कच्चे तेल आणि एलपीजीच्या पुरवठ्याचे नवे संकट उभे राहिले आहे. त्याचा थेट परिणाम भारतावर होताना दिसत आहे. केंद्र सरकारने आपत्कालीन अधिकारांचा वापर करत देशातील सर्व तेल रिफायनरी कंपन्यांना एलपीजी उत्पादन वाढवण्याचे आदेश दिले आहेत.

भारत कच्चे तेल आणि गॅस प्रामुख्याने रशिया, पश्चिम आफ्रिका, अमेरिका आणि आखाती देशांकडून आयात करतो. गेल्या काही वर्षांत भारताने ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीने विविध देशांसोबत नवे करार केले आहेत. अमेरिका आणि संयुक्त अरब अमिरातसारख्या भागीदार देशांसोबतही ऊर्जा पुरवठा व्यवस्थेची नवी रचना करण्यात आली आहे. गेल्या दहा वर्षांत भारताने तेल पुरवठ्याचे स्रोत २७ देशांवरून ४० देशांपर्यंत वाढवले असून हे स्रोत सहा खंडांमध्ये पसरलेले आहेत. तरीही सध्याच्या युद्धामुळे जागतिक पुरवठा साखळीबाबत गंभीर चिंता व्यक्त केली जात आहे.

इराणने होर्मुझ सामुद्रधुनीची नाकाबंदी करण्याचा निर्णय घेतल्याने परिस्थिती आणखी गंभीर झाली आहे. पुण्यात व्यावसायिक एलपीजी गॅसचा पुरवठा जवळपास पूर्णपणे बंद झाल्याने अनेक हॉटेल्समध्ये स्वयंपाकासाठी गॅस उपलब्ध नाही. त्यामुळे हॉटेल आणि फूड इंडस्ट्रीची कामकाजाची दिनचर्या विस्कळीत झाली आहे. दुसरीकडे गॅस तुटवड्याचा परिणाम पुण्यातील सदाशिव पेठेतील वैकुंठ स्मशानभूमीवरही झाला आहे. येथे गॅसवर चालणाऱ्या ५ दाहिन्या तात्पुरत्या बंद ठेवाव्या लागल्या आहेत. गॅसचा पुरवठा खंडित झाल्यामुळे हा निर्णय घ्यावा लागल्याचे प्रशासनाने सांगितले आहे.

## गॅस-इंधन तुटवड्याच्या अफवा पसरवू नका: मुख्यमंत्री

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई:** अमेरिका, इस्रायल आणि इराणमध्ये सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर देशात गॅस आणि इंधनाचा तुटवडा निर्माण होणार असल्याच्या चर्चांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. लोकांमध्ये चुकीची माहिती पसरवून पॅनिक निर्माण करू नये, असे सांगत भारत सरकारने ऊर्जा सुरक्षेबाबत स्पष्ट भूमिका घेतली असल्याचे त्यांनी नमूद केले.

घरगुती एलपीजी गॅस सिलेंडरच्या दरात ६० रुपयांची वाढ झाल्याबाबत विचारले असता फडणवीस म्हणाले की, भारताच्या एनर्जी सिक्युरिटीसाठी केंद्र सरकारने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली महत्त्वाची पावले उचलली आहेत. त्यामुळे देशात इंधन किंवा गॅसच्या तुटवड्याची भीती बाळगण्याचे कारण नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, मध्यपूर्वेतील संघर्षामुळे जागतिक बाजारपेठेवर परिणाम होत असल्याने भारतातही एलपीजी गॅसच्या पुरवठ्यावर ताण येत असल्याची चर्चा सुरू आहे. विशेषतः कमर्शियल एलपीजी गॅसच्या दरात अचानक १५० ते २०० रुपयांची वाढ झाल्याने हॉटेल उद्योग अडचणीत आला आहे. त्याचबरोबर घरगुती गॅस सिलेंडरच्या दरातही ६० रुपयांची वाढ झाल्याने सर्वसामान्यांच्या घरखर्चाचे गणित बिघडल्याची भावना व्यक्त होत आहे.

या संदर्भात बोलताना फडणवीस म्हणाले की, गेल्या दोन-तीन दिवसांत काही माध्यमांनी पेट्रोल-डिझेल तुटवड्याच्या बातम्या दिल्याने लोकांनी विनाकारण पेट्रोल पंपांवर मोठ्या रांगा लावल्या. मात्र भारत सरकारने स्पष्ट केले आहे की देशात इंधनाची कोणतीही कमतरता नाही.

## गंगाधाम रोडवर गोळीबारात तरुण जखमी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : पुण्यात पुन्हा एकदा टोळी संघर्षाचे सावट गडद झाले असून गंगाधाम रोड परिसरात शुक्रवारी उशिरा रात्री गोळीबाराची धक्कादायक घटना घडली. या घटनेत एका तरुणाच्या पाठीत गोळी लागून तो गंभीर जखमी झाला आहे. जखमी तरुणाचे नाव मोझेस शेकापूरे उर्फ मोज्या (वय २२, रा. मिनाताई ठाकरे वसाहत, गुलटेकडी) असे असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मार्केटयार्ड परिसरातील वखार महामंडळाकडून गंगाधामकडे जाणाऱ्या रस्त्यावर रात्री साडेअकराच्या सुमारास हा प्रकार घडला. परिसरातील वर्चस्वाच्या कारणावरून या गटांमध्ये यापूर्वीही अनेकदा वाद झाले होते.

शुक्रवारी दुपारी बालाजी उमाप आणि अमित शेकापूरे यांच्यात पुन्हा वाद झाला होता. त्यानंतर रात्री अमितचा भाऊ मोझेस शेकापूरे आणि त्याचा मित्र दुचाकीवरून गंगाधामकडे जात असताना बालाजी उमाप, राम उमाप आणि त्यांच्या चार ते पाच साथीदारांनी त्यांना रस्त्यात अडवले. यावेळी पिस्तुलातून गोळीबार करण्यात आला. हल्लेखोरांचा मुख्य निशाणा शेकापूरेचा मित्र असल्याची माहिती आहे; मात्र नेम चुकल्याने गोळी मोझेसच्या पाठीत लागली.

या प्रकरणी मार्केटयार्ड पोलीस ठाण्यात बालाजी उमाप, राम उमाप आणि त्यांच्या साथीदारांविरुद्ध खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला असून वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत जगताप पुढील तपास करत आहेत.

### इराणचे सचिवालय लवकरच नाव जाहीर करणार

# इराणच्या नव्या सर्वोच्च नेत्याची निवड

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : इराणच्या नव्या सर्वोच्च नेत्याची निवड करण्यात आली असून त्याचे नाव लवकरच जाहीर केले जाणार आहे. रविवारी इराणमध्ये सर्वोच्च नेता निवडणाऱ्या तज्ज्ञांच्या सभेने मतदानाद्वारे हा निर्णय घेतल्याची माहिती समोर आली आहे. दिवंगत सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या मृत्यूनंतर हा निर्णय घेण्यात आला आहे.



इराणच्या मेहर न्यूज एजन्सीनुसार, तज्ज्ञांच्या सभेचे सदस्य अहमद अलामोलहोदा यांनी सांगितले की नवीन नेत्याची निवड करण्यासाठी मतदान पार पडले असून योग्य उमेदवाराची निवड करण्यात आली आहे. या निर्णयाची अधिकृत घोषणा संस्थेचे सचिवालय लवकरच करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

काही सदस्यांनी या निर्णयाला दुजोरा देताना दिवंगत नेते अली खामेनी यांचे पुत्र मोज्तबा खामेनी हे संभाव्य उत्तराधिकारी असू शकतात, असे संकेत दिले आहेत. मोज्तबा खामेनी यांना त्यांच्या वडिलांचे संभाव्य उत्तराधिकारी म्हणून यापूर्वीपासूनच पाहिले जात होते.

इराणमधील सर्वोच्च नेता हे देशातील सर्वोच्च राजकीय आणि धार्मिक पद मानले जाते. या पदावर असलेल्या व्यक्तीकडे लष्कर, न्यायव्यवस्था आणि परराष्ट्र धोरणासह देशातील सर्व महत्त्वाच्या निर्णयांवर अंतिम अधिकार असतो.

दरम्यान, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पुढील नेता निवडण्याच्या प्रक्रियेत अमेरिकेची भूमिका असावी असा आग्रह धरल्याची चर्चा आहे. मात्र इराणी अधिकाऱ्यांनी हा दावा स्पष्टपणे फेटाळून लावला आहे. इराणच्या फार्स न्यूज एजन्सीने प्रसिद्ध केलेल्या व्हिडिओमध्ये असेंब्लीचे सदस्य मोहम्मद मेहदी मीरबाघेरी यांनी बहुमताने एकमत साधून नवीन नेत्याची निवड झाल्याची पुष्टी केली.


याचदरम्यान इस्रायली लष्कराच्या पर्शियन भाषेतील अधिकृत सोशल मीडिया खात्यावरून या बैठकीत सहभागी होणाऱ्या सदस्यांना इशारा देण्यात आला. उत्तराधिकारी निवडण्याच्या प्रक्रियेवर इस्रायल बारकाईने लक्ष ठेवत असून आवश्यक असल्यास लक्ष्य करण्यास मागेपुढे पाहणार नाही, अशी धमकी त्या पोस्टमध्ये देण्यात आली आहे. त्यामुळे मध्यपूर्वेतील तणाव आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, इराणचे सुरक्षा प्रमुख अली लारीजानी यांनी अमेरिकेला कठोर इशारा देत सांगितले की, "आमच्या नेत्याच्या आणि आमच्या लोकांच्या रक्ताचा बदला घेतल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही." त्यांनी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना लक्ष्य करत इराणची प्रतिक्रिया अजून बाकी असल्याचे स्पष्ट केले.

## पुण्यातील सिंहगड कॉलेजच्या एचओडीची आत्महत्या

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : शहरातील शैक्षणिक क्षेत्राला हादरवून टाकणारी घटना समोर आली असून सिंहगड डेंटल कॉलेजमधील विभागप्रमुखांनी राहत्या घरी आत्महत्या केल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. या घटनेमुळे महाविद्यालयीन वर्तुळात खळबळ उडाली असून पोलिसांना घटनास्थळी आत्महत्येपूर्वी लिहिलेली सुसाईड नोटही सापडली आहे. आत्महत्या केलेल्या प्राध्यापकांचे नाव राजू पाटील असे असून ते सिंहगड डेंटल कॉलेज येथे विभागप्रमुख (एचओडी) म्हणून कार्यरत होते. त्यांच्या आकस्मिक मृत्यूमुळे कुटुंबीयांसह सहकारी प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांमध्ये शोककळा पसरली आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना शनिवारी दुपारी सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली. त्या वेळी पाटील यांच्या पत्नी घरी परतल्या असता त्यांना ही बाब लक्षात आली. त्यांनी तात्काळ पोलिसांना माहिती दिल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पंचनामा केल्यानंतर मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे.प्राथमिक तपासात घटनास्थळी सापडलेल्या सुसाईड नोटमध्ये कामाच्या ताणामुळे आत्महत्येचा निर्णय घेतल्याचा उल्लेख असल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, आत्महत्येमागील नेमके कारण हेच आहे की आणखी काही कारणे आहेत, याबाबत पोलिस अधिक तपास करत आहेत. दरम्यान, काही दिवसांपूर्वी सिंहगड डेंटल कॉलेजवर शैक्षणिक नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी मोठी कारवाई करण्यात आली होती.

विद्यापीठ अधिनियमातील तरतुदींचे उल्लंघन केल्याचा आरोप महाविद्यालयावर ठेवण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर विभागप्रमुखांच्या सुसाईड नोटमध्ये कामाच्या ताणाचा उल्लेख आढळल्यामुळे विविध तर्कवितर्क व्यक्त केले जात आहेत. पोलिस या प्रकरणाचा सखोल तपास करत असून पुढील तपासानंतरच आत्महत्येमागील नेमकी कारणे स्पष्ट होणार आहेत.

## राहुल गांधींच्या हमींवर टीका

**तिरुवनंतपुरम** : काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केरळसाठी पाच निवडणूक हमी जाहीर केल्यानंतर, रविवारी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आणि भाजप नेत्यांनी आश्वासनांवर टीका केली, तर काही नेत्यांनी ते अंमलात आणले जाणार नाहीत असा दावा केला. राहुल यांनी केएसआरटीसी बसमध्ये महिलांसाठी मोफत प्रवास, महाविद्यालयात शिकणाऱ्या मुलींसाठी दरमहा १,००० रुपये, कल्याणकारी पेन्शनमध्ये दरमहा ३,००० रुपये वाढ, २५ लाख रुपयांचे कुटुंब विमा संरक्षण आणि तरुण उद्योजकांसाठी ५ लाख रुपयांचे व्याजमुक्त कर्ज देण्याची घोषणा केली होती.

## युद्धाचा आखाती देशांना आर्थिक फटका

### अमेरिकेसोबतच्या गुंतवणूक करारांचा फेरविचार सुरू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : अमेरिका आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या युद्धामुळे आखाती देशांच्या अर्थव्यवस्थेवर मोठा ताण निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती, कुवेत आणि कतारसारख्या प्रमुख देशांनी अमेरिकेसोबत केलेल्या गुंतवणूक करारांचा आणि भविष्यातील योजनांचा फेरविचार सुरू केल्याची माहिती समोर आली आहे. फायनान्शिअल टाईम्सने दिलेल्या वृत्तानुसार, युद्धामुळे वाढलेल्या आर्थिक दबावातून मार्ग काढण्यासाठी विद्यमान करारांमध्ये 'फोर्स मेज्योर' कलम लागू करता येईल का, याबाबत या देशांच्या अधिकाऱ्यांमध्ये अंतर्गत चर्चा सुरू आहे. या संभाव्य फेरविचाराचा परिणाम विदेशी सरकारे आणि कंपन्यांना दिलेल्या गुंतवणुकीच्या आश्वासनांवर, जागतिक व्यवसायांसोबतच्या करारांवर, क्रीडा प्रायोजकत्वांवर तसेच काही मोठ्या होल्डिंग्सच्या विक्रीवर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

युद्धामुळे आखाती देशांच्या अर्थव्यवस्थेवर अनेक स्तरांवर परिणाम होत आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जगातील सुमारे २० टक्के तेल आणि गॅसची वाहतूक होते. मात्र युद्धादरम्यान इंधनाच्या टँकर्सवर झालेल्या हल्ल्यांमुळे या मार्गावरील वाहतूक मंदावली असून ऊर्जा निर्यातीमधून मिळणाऱ्या महसुलात मोठी घट झाली आहे. इराणने प्रदेशातील अमेरिकन लष्करी तळ, दूतावास आणि पायाभूत सुविधांवर केलेल्या हल्ल्यांमुळे पर्यटन आणि विमानवाहतूक क्षेत्रालाही मोठा फटका बसला आहे. याचा परिणाम म्हणून आखाती देशांच्या अर्थव्यवस्थेतील उत्पन्नाचे स्रोत दबावाखाली आले आहेत.

दरम्यान, संरक्षण खर्चात झालेली अचानक वाढ आणि ऊर्जा निर्यातीत झालेली घट यामुळे या देशांच्या सरकारी बजेटवरही मोठा अतिरिक्त ताण निर्माण झाला आहे.

### पुणेकरांच्या वाहतुकीला मोठा दिलासा

# विद्यापीठ चौकातील दुमजली उड्डाणपूल खुला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : पुण्यातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चौकातील बहुप्रतीक्षित एकात्मिक दुमजली उड्डाणपुलाचे आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे लोकार्पण करण्यात आले. या उड्डाणपुलामुळे विद्यापीठ रस्ता, पाषाण आणि बाणेर परिसरातील वाहतूक कोंडी कमी होऊन नागरिकांचा प्रवास अधिक सुलभ होणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

या प्रकल्पाबाबत बोलताना केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सांगितले की, २०२० मध्ये ते पुण्याचे महापौर असताना आणि अजित पवार पालकमंत्री असताना दुमजली पुलाची कल्पना समोर आली होती. वर मेट्रो मार्गिका आणि उड्डाणपूल, तर खाली रस्ता असा एकात्मिक आराखडा तयार करण्याचा निर्णय त्यावेळी घेण्यात आला. या प्रकल्पासाठी अजित पवार यांनी सातत्याने पाठपुरावा केला, तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही विकासकामासाठी सहकार्य दिले, असे त्यांनी सांगितले.



मोहोळ म्हणाले की, शहराच्या विकासासाठी आम्ही सातत्याने एकत्रित काम केले. मात्र आजच्या या उद्घाटन सोहळ्यात अजित पवार नसल्याची खंत वाटत आहे. अनेक अडचणी दूर करण्यासाठी त्यांनी मोठे प्रयत्न केले. त्यामुळे या पुलाला अजित पवार यांचे नाव देण्यात यावे, अशी अनेकांची भावना असल्याचे त्यांनी नमूद केले.

दरम्यान, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनीही या प्रकल्पाबाबत बोलताना अजित पवार यांच्या योगदानाची आठवण करून दिली. त्या म्हणाल्या की, या पुलामुळे पुणेकरांना मोठा दिलासा मिळणार आहे. वाहतूक कोंडी कमी होऊन प्रवासाचा वेळ वाचेल. पुलाच्या कामासाठी काही ठिकाणी जुना पूल पाडण्याचा कठीण निर्णय अजित पवार यांनी घेतला आणि प्रकल्प पूर्ण होण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला.

विद्यापीठ चौकात मोठ्या प्रमाणात होणारी वाहतूक कोंडी लक्षात घेऊन या दुमजली उड्डाणपुलाची उभारणी करण्यात आली आहे. मेट्रो मार्गिका आणि उड्डाणपूल अशा एकत्रित स्वरूपामुळे चौकातील सिग्नलवरील ताण कमी होऊन वाहतुकीचा वेग वाढण्यास मदत होणार आहे. परिणामी, विद्यापीठ रस्ता, पाषाण आणि बाणेर परिसरातील नागरिकांचा प्रवास अधिक जलद आणि सुलभ होणार आहे.

## मनसेचा आज वर्धापनदिन सदस्य नोंदणीला सुरुवात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा उद्या २० वा वर्धापनदिन साजरा होत असून या पार्श्वभूमीवर पक्षाकडून राज्यभर सदस्य नोंदणी मोहीम सुरू करण्यात येणार आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना महत्त्वाचे आवाहन करत या मोहिमेत सक्रिय सहभाग घेण्याचे निर्देश दिले आहेत.

राज ठाकरे यांनी सांगितले की, ९ मार्च रोजी ते सकाळी रायगडावर जाऊन छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करतील आणि त्यानंतर सदस्य नोंदणी मोहिमेची सुरुवात करतील. रायगड हा शिवराज्याभिषेकाचा साक्षीदार असलेला पवित्र किल्ला असल्याने अशा ऐतिहासिक ठिकाणाहून ही मोहीम सुरू करणे विशेष महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

पदाधिकाऱ्यांना उद्देशून बोलताना राज ठाकरे म्हणाले की, सदस्य नोंदणी ही केवळ महाराष्ट्र सैनिकांपुरती मर्यादित नसावी. महाराष्ट्राला नवे रूप द्यायची इच्छा असणारे आणि सध्याच्या परिस्थितीबद्दल असंतोष असणारे सर्व नागरिक या नवनिर्माणाच्या प्रवासात सहभागी व्हावेत, यासाठी प्रयत्न करा. आपल्यासोबत नव्याने जोडले जाणारे सर्वजण महाराष्ट्राचे पाईक आहेत, याची जाणीव त्यांना करून द्या, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी सदस्य नोंदणी डिजिटल पद्धतीनेही करण्यात येणार असल्याची माहिती देत त्याचा सविस्तर तपशील १० मार्च रोजी जाहीर केला जाईल, असे त्यांनी सांगितले. केवळ पक्षाच्या शाखांबाहेर स्टॉल लावून नोंदणी करण्यापेक्षा राज्यभरातील गर्दीच्या ठिकाणी सदस्य नोंदणी केंद्र उभारावीत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## संपादकीय


# युद्ध, नैतिकता आणि भारताचा आवाज



**पश्चिम आशियात पुन्हा एकदा युद्ध पेटले आहे. इस्रायल आणि अमेरिकेच्या संयुक्त कारवाईमुळे इराणविरुद्धचा संघर्ष उभा ठाकला आहे. हा प्रश्न नैतिकतेचा, आंतरराष्ट्रीय कायद्याचा आणि जागतिक शक्तीसमतोलाचा आहे. या संघर्षात भारताची भूमिका आणि त्याचे परिणाम अधिक गंभीर ठरतात.**

जागतिक राजकारणात युद्धे बहुतेक वेळा एका घटनेतून सुरू होत नाहीत; त्यामागे तयार केलेली कारणे, रचलेली कथा आणि आधीच ठरवलेले निष्कर्ष असतात. पश्चिम आशियात उभे ठाकलेले नवे युद्ध हे त्याचेच उदाहरण म्हणावे लागेल. इस्रायलने अमेरिकेला पटवून दिले की इराण अण्वस्त्रांच्या उंबरठ्यावर उभा आहे आणि त्यामुळे तातडीने कारवाई करणे आवश्यक आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीही हा युक्तिवाद स्वीकारला आणि इराणविरुद्ध लष्करी कारवाई सुरू झाली. परंतु या कथित धोक्याच्या पुराव्यांबाबतच अमेरिकेतील काही अधिकाऱ्यांनी शंका व्यक्त केल्याच्या बातम्या पुढे आल्या. त्यामुळे या युद्धाच्या नैतिकतेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले. जगाला ही परिस्थिती अनोखी नाही. यापूर्वीही अशा कारणांवर युद्धे उभी केली गेली आहेत. २००३ मध्ये अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुश यांनी इराककडे ‘सामूहिक विनाशकारी शस्त्रे’ असल्याचा दावा करत त्या देशावर आक्रमण केले. पुढे असे कोणतेही शस्त्रसाठे आढळले नाहीत. २०११ मध्ये लिबियामध्ये मुअम्मर गद्दाफी नागरिकांची कत्तल करणार असल्याचा दावा करत अमेरिकेने हस्तक्षेप केला. त्या हस्तक्षेपाने लिबिया आजवर अस्थिरतेत ढकलला गेला. इतिहासाचा हा धडा असा की युद्धाचे कारण म्हणून मांडलेले युक्तिवाद अनेकदा राजकीय असतात, वस्तुस्थितीचे नसतात. इराणच्या बाबतीतही अशीच परिस्थिती दिसते. इस्रायलसाठी इराण हा दीर्घकाळापासूनचा मुख्य प्रतिस्पर्धी आहे. इराक आणि लिबिया यांसारख्या देशांची शक्ती कमी झाल्यानंतर पश्चिम आशियातील सामर्थ्यसंतुलनात इराण हा इस्रायलसमोरील एकमेव मोठा अडसर उरला. त्यामुळे इराणविरोधी आघाडी उभारण्याची इस्रायलची दीर्घकालीन भूमिका आहे. अमेरिकेने त्या भूमिकेला पाठिंबा दिला आणि त्यातून हे युद्ध उभे राहिले. परंतु आंतरराष्ट्रीय कायद्याच्या दृष्टीने अशा कारवायांची वैधता नेहमीच प्रश्नांकित राहिली आहे. अमेरिकेच्या संविधानानुसार दुसऱ्या देशाविरुद्ध युद्ध छेडण्यासाठी काँग्रेसची परवानगी आवश्यक असते. संयुक्त राष्ट्रांच्या सनदेनुसारही सार्वभौम देशावर आक्रमण करणे किंवा त्या देशात राजवट बदलण्याचा प्रयत्न करणे ही बेकायदेशीर बाब मानली जाते. तरीही जगातील महासत्ता या नियमांना अनेकदा सोयीप्रमाणे वाकवताना दिसतात. ‘शासन बदल’ हा शब्द गेल्या दोन दशकांत आंतरराष्ट्रीय राजकारणात फार वापरला गेला. एखाद्या देशातील सरकार कितीही वादग्रस्त असले तरी ते बदलण्याचा अधिकार त्या देशातील जनतेचा असतो. बाह्य शक्तींनी हस्तक्षेप करून सत्ता बदलण्याचा प्रयत्न केला की त्याचे परिणाम अनेकदा दीर्घकालीन अस्थिरतेत होतात. इराक, लिबिया आणि अफगाणिस्तान यांची उदाहरणे अजून ताजी आहेत. इराणविरुद्धच्या सध्याच्या युद्धातही हा मुद्दा मध्यवर्ती आहे. अमेरिका आणि इस्रायलच्या कारवाईमागे केवळ अण्वस्त्रांचा प्रश्न नाही, तर तेहरानमधील सत्ताकेंद्र बदलण्याची राजकीय इच्छा आहे, अशी टीका अनेक तज्ज्ञ करत आहेत. इस्रायलचे उद्दिष्ट पश्चिम आशियात स्वतःचे वर्चस्व प्रस्थापित करणे हे असल्याचा आरोपही केला जातो. या साऱ्या घडामोडींमध्ये भारताची भूमिका वेगळीच कोंडी निर्माण करणारी ठरली आहे. इस्रायलशी वाढते धोरणात्मक संबंध आणि दुसरीकडे अरब जगताशी असलेले आर्थिक व ऊर्जा हितसंबंध यामध्ये संतुलन राखणे ही भारताची पारंपरिक भूमिका होती. दीर्घकाळ भारताने इस्रायल आणि पॅलेस्टाईन या दोन्हींकडे संवादाची भूमिका ठेवली. त्यामुळे भारताला काही प्रमाणात नैतिक आणि राजनैतिक वजन मिळत असे. परंतु अलीकडच्या काळात हे संतुलन ढळताना दिसते. इस्रायलवरील हल्ल्यांचा निषेध करताना भारताने ठाम भूमिका घेतली; परंतु गाझामधील व्यापक विनाशाबद्दल त्याच तीव्रतेने भाष्य झाले नाही. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इस्रायलच्या संसदेत व्यक्त केलेला ठाम पाठिंबा अनेक देशांच्या नजरेत भारताला एका बाजूला उभे करणारा ठरला. याचे परिणाम आता स्पष्ट दिसू लागले आहेत. पश्चिम आशियात संघर्ष वाढत असताना भारताची मध्यस्थीची क्षमता कमी झाल्याचे जाणवते. एकेकाळी इराण, अरब देश आणि इस्रायल या सर्वांशी संवाद साधू शकणारा देश म्हणून भारताची ओळख होती. आता त्या भूमिकेवर मर्यादा आल्यासारख्या दिसतात. ही बाब भारतासाठी केवळ राजनैतिक नाही; ती व्यावहारिकही आहे. पश्चिम आशियात सुमारे एक कोटी भारतीय काम करतात. भारताच्या ऊर्जा सुरक्षेचा मोठा भाग या प्रदेशावर अवलंबून आहे. तेल आयात, व्यापार आणि गुंतवणूक या सर्व बाबींसाठी हा प्रदेश महत्त्वाचा आहे. इराणमधील चाबहार बंदर प्रकल्पात भारताने मोठी गुंतवणूक केली आहे. त्यामुळे या प्रदेशातील अस्थिरतेचा परिणाम भारतावर अपरिहार्यपणे होणार आहे. इराणने या युद्धाला प्रत्युत्तर देताना अनेक अरब देशांतील अमेरिकन तळांना लक्ष्य केले आहे. संघर्षाचा व्याप वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अशा वेळी भारतासारख्या देशाने संतुलित आणि विवेकी भूमिका घेणे अपेक्षित असते. परंतु राजकीय विधानांमुळे निर्माण झालेल्या प्रतिमेमुळे भारताचा आवाज कमकुवत झाल्याची टीका होत आहे. जागतिक राजकारणात युद्धे अनेकदा तात्कालिक विजय देतात; परंतु त्यांचे दीर्घकालीन परिणाम व्यापक असतात. पश्चिम आशियातील हा संघर्षही त्याला अपवाद ठरणार नाही. या परिस्थितीत भारतासमोरचा खरा प्रश्न तो प्रेक्षक राहणार की पुन्हा एकदा संतुलित आणि प्रभावी राजनैतिक आवाज म्हणून उभा राहणार, हा आहे.

# हे सरता संपत नाही, चांदणे तुझ्या स्मरणांचे ..!



**» पल पल दिल के पास तुम रहते हो.. किशोर कुमारच्या जादुई आवाजातील हे गाणं होम थिएटरवर सुरू झालं आणि अजितदादांच्या आठवणींचा गहिवर डोळ्यांतून बांध फुटावा तसा फुटला.**

एक महिना उलटून गेला. कारण ते जेव्हा घडलं तेव्हा बारामती एअरपोर्टवर त्यांना रिसिव्ह करायला मी गेलो होतो. दादांचे विमान आले. लँड होत आहे असं वाटत असतानाच ते पुन्हा माघारी गेलं. काही वेळाने पुन्हा आलं आणि कोसळलं. तो आघात काळजावर झाला आहे. दुःखाची कधीही न भरून येणारी, भळभळणारी जखम गाठीशी बांधली गेली आहे.

त्यानंतर दादांच्या कुटुंबाच्या पाठीशी उभे राहणे हे कर्तव्य समजून गेल्या महिनाभर धावाधाव सुरू आहे. कोणी काही म्हणेल; मात्र काही गोष्टींना पर्याय नसतो. अजितदादा यांचे नाव चिरंतन राखण्यासाठी आणि त्यांचे काम पुढे नेण्यासाठी कामच करावे लागणार. त्यात कसूर होणार नाही.

त्या सर्व धावपळीतून आज माझ्या कुटुंबासोबत थोडासा निवांत वेळ मिळाला. पत्नीही म्हणाली, खूप दगदग झाली आहे तुमची. तब्येतीकडे लक्ष नाही. आज विश्रांती घ्या. तिने चहाचा कप हाती दिला. किशोर कुमारचे ‘पल पल दिल के पास’ लागले आणि चहाच्या कपातून अलगद उमटणाऱ्या वाफांचे धुके जणू डोळ्यांत साचले. डोळ्यांतून पाण्याच्या धारा सुरू झाल्या.

दादांना किशोर कुमारची गाणी आवडतात म्हणून संग्रामनेच दादांना असा एक पेन ड्राइव्ह दिला होता. आम्ही गाडीत बसलो की दादा मनवेना म्हणायचे, “तो संग्रामने दिलेला पेन ड्राइव्ह लाव.” त्यात मग हे गाणं लागलं की दादा अगदी चुटकी वाजवत किशोरच्या आवाजात स्वतःचा आवाज मिसळायचे.

तेच गाणं आज सकाळी कानी पडलं आणि डोळे वाहू लागले.

दादांसोबत काम करतानाच्या अनेक आठवणींनी पुन्हा एकदा मनात फेर धरला. आता फक्त आठवणीच उरल्या आहेत या जाणिवेने भडभडून आलं.

तसा मी खूप वास्तववादी आहे. पण दादा आता नाहीत, या वास्तवाला सामोरे जाणं अजून शक्य होत नाही. एकटा राहिलो तर अशीच अवस्था होणार हे मला माहीत आहे. त्यामुळे स्वतःला कामाला जुंपून घेतलं आहे.

आज पत्नीच्या आग्रहास्तव निवांत बसून राहिलो आणि जे वाटलं होतं तेच घडलं.

दादा केवळ एका गाण्याने नाही तर अशा असंख्य कारणांनी आठवणीत आहेत. आयुष्यातील एक फार मोठा काळ माझं आयुष्य अजितदादा या व्यक्तीने व्यापलं होतं. माझं अस्तित्व, माझी ओळख, माझं असणं, जगणं या साऱ्याचं कारण अजितदादा होते. महाराष्ट्रभर गावोगावी स्नेहसंबंधांचे असंख्य धागे विणले गेले, त्याचं कारण दादा होते.



त्या धाग्यांतून विणल्या गेलेल्या रेशीमशेल्याने आयुष्य उबदार झालं. ते तेव्हा जाणवलं नाही; आता मात्र दादांच्या नसण्याने ती जाणीव होत आहे. तेव्हा ते जाणवण्याचं कारणही नव्हतं. कारण दादांशिवाय आयुष्य असा विचारही मनाला कधी शिवला नव्हता.

काळ कोणासाठी थांबत नाही, हे सत्यच. मात्र आमच्या आयुष्याला ब्रेक लागल्यासारखं झालं आहे. पण थांबून चालणार नाही. दिदी, पार्थदादा, जयदादा यांच्यासाठी त्यांच्यासोबत जिद्दीने पुढे पाऊल टाकावं लागणार आहे.

ही जिद्द बळकट करण्यासाठी अशा निवांतपणाला आता आयुष्यात थारा नाही. त्या निर्धाराने डोळे पुसले आहेत. मोठ्या कष्टाने अश्रू रोखण्याचा प्रयत्न केला आहे. काळीज मात्र आक्रंदत आहे.

ग्रेस यांच्या कवितेतील चार ओळी पाठ सोडत नाहीत. त्या ओळी आहेत —

स्तोत्रांत इंद्रिये अवघी,  
गुणगुणती दुःख कुणाचे?  
हे सरता संपत नाही,  
चांदणे तुझ्या स्मरणांचे.

**— सुनीलकुमार मुसळे.**

# मालमत्ताकर अभय योजनेला मोठा प्रतिसाद

## सहा दिवसांत महापालिकेच्या तिजोरीत २० कोटींची भर

**■ दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरातील थकबाकीदार मालमत्ताधारकांना मालमत्ताकराची थकबाकी भरता यावी यासाठी महापालिकेच्या वतीने विलंब दंडात तब्बल ९० टक्के सवलत देणारी अभय योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेला थकबाकीदारांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून योजना सुरू झाल्यापासून अवघ्या सहा दिवसांत महापालिकेच्या तिजोरीत सुमारे २० कोटी रुपयांचा भरणा झाला आहे. या कालावधीत तब्बल ७ हजार ४०० मालमत्ताधारकांनी थकबाकी भरून मोठा आर्थिक दिलासा मिळवला आहे.

महापालिकेच्या करसंकलन विभागाच्या माहितीनुसार शहरातील २ लाख १२ हजार ४४० मालमत्ताधारकांनी २८ फेब्रुवारीपर्यंत मालमत्ताकर भरलेला नव्हता. थकीत कराची वसुली गतीमान करण्यासाठी महापालिकेने १ मार्चपासून अभय योजना लागू केली आहे. या योजनेअंतर्गत निवासी, बिगरनिवासी, औद्योगिक तसेच मोकळ्या जागांवरील थकीत मालमत्ताकर एकरकमी भरल्यास विलंब दंडावर ९० टक्के सवलत दिली जात आहे. ही योजना ३१ मार्चपर्यंत लागू राहणार आहे.

महापालिकेच्या आकडेवारीनुसार कर न भरलेल्या मालमत्ताधारकांमध्ये निवासी मालमत्तांची संख्या सर्वाधिक आहे. शहरातील १ लाख ८० हजार २७ निवासी मालमत्ताधारकांकडे सुमारे ४०४ कोटी ७५ लाख रुपयांची थकबाकी आहे. याशिवाय १८ हजार २८४ बिगरनिवासी मालमत्ताधारकांकडे एकूण ३४१ कोटी ५८ लाख रुपयांची थकबाकी आहे. मिश्र प्रकारातील ५ हजार २३३ मालमत्ताधारकांकडे थकबाकी आहे, तर १ हजार ३४१ औद्योगिक मालमत्ताधारकांकडे सुमारे १८ कोटी २ लाख रुपयांची थकबाकी आहे. तसेच ५ हजार ३०८ मोकळ्या जमीनधारकांकडे एकूण ३७४ कोटी ४१ लाख रुपयांची थकबाकी असून इतर २४७ मालमत्ताधारकांकडे सुमारे ४० लाख रुपयांची थकबाकी आहे.

अभय योजना लागू झाल्यानंतर थकबाकीदारांकडून कर भरण्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे. रविवार (दि.१) ते शुक्रवार (दि.६) या सहा दिवसांच्या कालावधीत एकूण ७ हजार ३७८ मालमत्ताधारकांनी थकीत मालमत्ताकर भरला आहे. या कालावधीत महापालिकेकडे एकूण १९ कोटी ८९ लाख रुपयांचा भरणा झाला आहे. या योजनेमुळे मालमत्ताधारकांना विलंब दंडात मोठी सूट मिळत असून महापालिकेलाही थकीत कर वसुलीत दिलासा मिळत आहे. त्यामुळे मार्चअखेरपर्यंत या योजनेतून मोठ्या प्रमाणात थकबाकी वसुली होण्याची शक्यता आहे.

# पुण्यात उष्णतेची तीव्रता वाढली लोहगावमध्ये तापमान ३९ अंशांवर

**■ दैनिक राज्य लोकतंत्र**

**पुणे :** शहरातील उष्णतेचा पारा दिवसेंदिवस वाढत असून मार्च महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात उन्हाचा चटका तीव्र झाला आहे. गेल्या २४ तासांत कमाल तापमानात सुमारे एक ते दीड अंशाने वाढ झाल्याने शनिवारी (दि. ७) लोहगाव परिसरात तापमान ३९ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले. कोरेगाव पार्क, शिवाजीनगर आणि चिंचवड परिसरातही वाढत्या उष्णतेमुळे नागरिकांची अक्षरशः लाहीलाही होत आहे.

गेल्या काही दिवसांपासून शहरात सलग चौथ्या दिवशी कमाल तापमानात वाढ होत असून दुपारी १२ ते ३ या कालावधीत उन्हाचा चटका अधिक तीव्र जाणवत आहे. शहराच्या मध्यवर्ती भागासह कोरेगाव पार्क, पाषाण, मगरपट्टा, हडपसर परिसरात उष्णतेच्या झळा अधिक जाणवत आहेत. विदर्भापाठोपाठ पुणे शहरातही उन्हाची तीव्रता वाढू लागल्याचे चित्र दिसत आहे.

हवामान विभागाच्या नोंदीनुसार लोहगाव आणि कोरेगाव पार्क येथे सर्वाधिक ३८.५ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. लवळे येथे ३७.१ अंश, चिंचवड परिसरात ३६.८ अंश, शिवाजीनगर येथे ३६.६ अंश तर मगरपट्टा परिसरात ३५.९ अंश सेल्सिअस कमाल तापमान नोंदविण्यात आले.

वाढत्या उष्णतेमुळे नागरिक घामाघूम होत असून काहींना चक्कर येणे, डोकेदुखी, पोटदुखी आणि अशक्तपणा यांसारख्या त्रासांचा सामना करावा लागत आहे.

# १३० मोबाईल शोधून नागरिकांना परत

**■ दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** सांगवी परिसरात हरविलेले व चोरीस गेलेले तब्बल १३० मोबाईल फोन शोधून ते मूळ मालकांना परत देण्याची उल्लेखनीय कामगिरी सांगवी पोलिसांनी केली आहे. केंद्र सरकारच्या सीईआयआर पोर्टलच्या माध्यमातून ही कार्यवाही करण्यात आली.

काही मोबाईल वीस दिवसांपूर्वी हरवलेले होते, तर काही तब्बल चार वर्षांपूर्वीचे असल्याने अनेक नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. चार वर्षांनंतर मोबाईल परत मिळाल्याने अनेकांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहताना दिसून आला.

हरविलेल्या मोबाईलची तक्रार दाखल होताच पोलिसांनी केंद्र सरकारच्या सीईआयआर पोर्टलवर नोंद करून संबंधित मोबाईलचा मागोवा घेण्याची प्रक्रिया सुरू केली. या तपासातून विविध ठिकाणी असलेले गहाळ व चोरीचे मोबाईल हस्तगत करण्यात आले. या मोहिमेत मिळालेल्या मोबाईलपैकी पहिल्या टप्प्यातील ५० मोबाईलचे वितरण सांगवी पोलिस ठाण्यात करण्यात आले.

सहाय्यक पोलिस आयुक्त सचिन हिरे यांच्या हस्ते नागरिकांना मोबाईल सुपूर्द करण्यात आले. यावेळी सांगवी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक जितेंद्र कोळी, पोलिस हवालदार राजाराम माने उपस्थित होते.

# अर्थसंकल्पात शहरवासीयांच्या पदरी पुन्हा निराशा

**■ दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** स्मार्ट सिटीच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या पिंपरी-चिंचवड शहराच्या महत्त्वाच्या विकास प्रकल्पांकडे राज्य सरकारच्या सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात पुन्हा दुर्लक्ष झाल्याचे चित्र समोर आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी (दि. ६) अर्थसंकल्प सादर केला. मात्र शहरातील पवना बंदिस्त जलवाहिनी, पवना नदी सुधार योजना तसेच मेट्रो मार्गांसाठी कोणतीही ठोस आर्थिक तरतूद न झाल्याने शहरवासीयांच्या पदरी निराशा आली आहे.



शहरासाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्प गेल्या तब्बल १४ वर्षांपासून रखडलेला आहे. या प्रकल्पावरील स्थगिती ८ सप्टेंबर २०२३ रोजी उठविण्यात आली असली तरी सुमारे १ हजार ५ कोटी रुपयांच्या सुधारित आराखड्याला अद्याप राज्य शासनाची मंजुरी मिळालेली नाही. शहराचा वाढीचा वेग लक्षात घेता भविष्यात पाणीटंचाईची समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मुळशी धरणातून ७६० एमएलडी पाणी आरक्षित करण्याचा प्रस्ताव महापालिकेने डिसेंबर २०२३ मध्ये राज्य सरकारकडे पाठविला आहे. मात्र त्यालाही अद्याप मंजुरी मिळालेली नाही.

दरम्यान मुळा नदी सुधार प्रकल्पाचे काम सुरू झाले असून इंद्रायणी नदी सुधार योजनेस शासनाकडून निधी मंजूर झाला आहे. मात्र शहरातून वाहणाऱ्या २४ किलोमीटर लांबीच्या पवना नदी सुधार प्रकल्पाच्या सुमारे १ हजार ४३५ कोटी रुपयांच्या आराखड्यालाही शासनाने अद्याप मंजुरी दिलेली नाही. तसेच राज्य आपत्ती निवारण निधीतून अपेक्षित ५८० कोटी रुपयांची तरतूदही करण्यात आलेली नाही. याशिवाय चिंचवड येथील खाणीजवळ उभारण्यात येणाऱ्या सिटी सेंटर या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या व्यापारी संकुलाच्या प्रस्तावालाही राज्य सरकारकडून मंजुरी मिळालेली नाही. तसेच नेहरुनगर येथील अण्णासाहेब मगर स्टेडियम परिसरात प्रस्तावित क्रीडा संकुलाचा प्रकल्पही प्रलंबित आहे. त्यामुळे शहराच्या महत्त्वाच्या विकास प्रकल्पांना निधी मिळेल, अशी अपेक्षा असलेल्या पिंपरी-चिंचवडकरांना या अर्थसंकल्पातून पुन्हा निराशा हाती आली आहे.

## नियम डावलून थेट आयुक्तांकडे शेकडो अर्ज

# स्वीकृत नगरसेवकांसाठी इच्छुकांची मोठी गर्दी

**■ दैनिक राज्य लोकतंत्र**

**पुणे :** पुणे महानगरपालिका निवडणुकीनंतर आता स्वीकृत नगरसेवकांच्या नियुक्तीची प्रक्रिया सुरू झाली असून या पदासाठी इच्छुकांची मोठी गर्दी झाली आहे. महापालिका अधिनियमातील तरतुदीनुसार स्वीकृत सदस्यांची नावे ही राजकीय पक्षांच्या संख्याबळानुसार गटनेत्यांशी चर्चा करून निश्चित करायची असतात आणि नंतर ती सर्वसाधारण सभेमार्फत मंजूर केली जातात. मात्र हा नियम डावलून अनेक इच्छुकांनी थेट महापालिका आयुक्तांकडे अर्ज दाखल केल्याने प्रशासनात संभ्रमाची स्थिती निर्माण झाली आहे.

महापालिका निवडणुकीनंतर स्वीकृत नगरसेवक नियुक्तीची प्रक्रिया सुरू करताना आयुक्तांनी संबंधित राजकीय पक्षांच्या गटनेत्यांशी चर्चा करून त्यांच्याकडून नावे मागवायची असतात. या प्रक्रियेनुसार पक्षांकडून शिफारस झाल्यानंतर आयुक्त महापौर आणि इतर गटनेत्यांशी चर्चा करून नावे सभागृहासमोर मंजुरीसाठी ठेवतात. अर्ज दाखल केल्याने ते अर्ज नियमांनुसार बाद होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

स्वीकृत नगरसेवकपदासाठी इच्छुकांकडून मोठ्या प्रमाणावर प्रयत्न सुरू आहेत. अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत सोमवारी सकाळी ११ ते दुपारी २ अशी निश्चित करण्यात आली आहे. मात्र त्यापूर्वीच तब्बल ७०० ते ८०० इच्छुकांनी थेट महापालिका आयुक्तांकडे लेखी अर्ज सादर केले आहेत. या अर्जांसोबत आवश्यक कागदपत्रेही जमा करण्यात आली असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.



नव्या नियमानुसार सभागृहातील संख्याबळ लक्षात घेता भाजपला १०, राष्ट्रवादी काँग्रेसला २ आणि काँग्रेसला १ स्वीकृत नगरसेवक पद मिळणार आहे. या जागांसाठी तिन्ही पक्षांमध्ये मोठी स्पर्धा आहे. संबंधित पक्ष सोमवारी आपापले उमेदवार अंतिम करून महापालिका आयुक्तांकडे यादी सादर करणार आहेत. त्यामुळे थेट आलेले अर्ज बाद होण्याची शक्यता अधिक असल्याचे प्रशासनातील सूत्रांचे म्हणणे आहे.

दरम्यान स्वीकृत नगरसेवकांच्या अर्जांची छाननी करण्यासाठी महापालिकेच्या निवडणूक विभागाने स्वतंत्र समिती नेमली आहे. या समितीत निवडणूक उपायुक्त प्रसाद काटकर, कर आकारणी व कर संकलन विभागाचे उपायुक्त रवी पवार, उपायुक्त विजयकुमार थोरात आणि उपायुक्त सोमनाथ आढाव यांचा समावेश आहे. त्यांच्या मदतीसाठी आठ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

भाजपकडून स्वीकृत नगरसेवकपदासाठीची यादी सोमवारी महापालिका आयुक्तांकडे दिली जाईल, अशी माहिती शहराध्यक्ष धीरज घाटे यांनी दिली. निवडणुकीदरम्यान अनेकांनी उमेदवारीची मागणी केली होती, मात्र काहींना उमेदवारी देता आली नाही. त्यापैकी काहींचा स्वीकृत नगरसेवकपदासाठी विचार केला जाईल. पराभूत उमेदवारांना संधी दिली जाणार नाही, असे पक्षाने आधीच स्पष्ट केले असल्याचे त्यांनी सांगितले.

राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष सुनील टिंगरे यांनी सांगितले की पक्षाकडे सुमारे १२० इच्छुकांची नावे आली आहेत. त्यातून अंतिम निवड करायची आहे. अद्याप बैठक झालेली नसून सोमवारपर्यंत नावे निश्चित केली जातील. काँग्रेसचे गटनेते चंदूशेठ कदम यांनी सांगितले की स्वीकृत नगरसेवकपदासाठी काँग्रेसकडे ६७ जण इच्छुक आहेत. त्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या असून अंतिम निर्णय पक्षाच्या प्रदेश नेतृत्वाकडून घेतला जाईल.

# मेट्रोत महिला व ज्येष्ठांसाठी राखीव आसन व्यवस्था

**■ दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरात धावणाऱ्या मेट्रोमध्ये महिला व ज्येष्ठ नागरिकांसाठी राखीव जागा नसल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय होत होती. या पार्श्वभूमीवर महिला व ज्येष्ठांकडून मेट्रोमध्ये स्वतंत्र राखीव आसन व्यवस्था करण्याची मागणी सातत्याने होत होती. या मागणीची दखल घेत पुणे व पिंपरी-चिंचवड महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन (महामेट्रो) प्रशासनाने मेट्रोच्या प्रत्येक ट्रेनमधील तिन्ही डब्यांमध्ये महिला व ज्येष्ठांसाठी राखीव जागा ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय जागतिक महिला दिनानिमित्त ८ मार्चपासून लागू करण्यात आला असल्याची माहिती महामेट्रोने दिली आहे.

सध्या वनाझ ते रामवाडी आणि पिंपरी-चिंचवड ते स्वारगेट या मार्गांवर मेट्रो सेवा सुरू आहे. दररोज दोन लाखांहून अधिक प्रवासी मेट्रोचा वापर करत असून त्यामध्ये महिला व ज्येष्ठ नागरिकांची संख्या लक्षणीय आहे. वाढत्या गर्दीत महिला व ज्येष्ठांना उभे राहून प्रवास करावा लागत असल्याच्या तक्रारी येत होत्या.

नवीन निर्णयानुसार प्रत्येक ट्रेनमध्ये एकूण ५४ जागा राखीव ठेवण्यात येणार आहेत. त्यापैकी ४६ जागा महिलांसाठी तर ८ जागा ज्येष्ठ नागरिकांसाठी असतील. पहिल्या कोचमध्ये महिलांसाठी १४ व ज्येष्ठांसाठी २, मधल्या कोचमध्ये महिलांसाठी १८ व ज्येष्ठांसाठी ४, तर तिसऱ्या कोचमध्ये महिलांसाठी १४ व ज्येष्ठांसाठी २ जागा राखीव असतील.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अ‍ॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### तडीपार आरोपीला चाकण पोलिसांकडून अटक

**चाकण :** पुणे जिल्ह्यातून तडीपार करण्यात आलेल्या एका सराईत आरोपीला चाकण परिसरात वावरताना चाकण उत्तर पोलिसांनी अटक केली. तडीपारीचा आदेश असतानाही तो परिसरात फिरत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. या प्रकरणी आरोपीविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार रोहन घोगरे (वय २८, रा. आंबेडकर नगर, चाकण) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

### एमपीडीए अंतर्गत आरोपी हर्सुल कारागृहात

**चाकण :** चाकण उत्तर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार अर्जुन बिरबल राठोड (वय ४०, रा. रासे, ता. खेड, जि. पुणे) याला एमपीडीए कायद्यान्वये एक वर्षासाठी हर्सुल मध्यवर्ती कारागृह, संभाजीनगर येथे स्थानबद्ध करण्यात आले आहे. याबाबतची माहिती चाकण पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक जितेंद्र कदम यांनी दिली.

### ८.८१ लाखांची ऑनलाइन फसवणूक

**चाकण :** बनावट ई-मेल आयडी तयार करून दोन कंपन्यांमधील आर्थिक व्यवहारात हस्तक्षेप करत ८ लाख ८१ हजार ९४२ रुपयांची ऑनलाइन फसवणूक झाल्याचा प्रकार चाकण परिसरात उघडकीस आला आहे. या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुद्ध चाकण उत्तर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एका कंपनीचा अधिकृत ई-मेल आयडी वापरून चीनमधील कंपनीशी व्यवहार सुरू होता. दरम्यान अज्ञात व्यक्तीने मूळ कंपनीसारखा दिसणारा बनावट ई-मेल आयडी तयार करून त्या व्यवहारात प्रवेश केला. त्यानंतर कंपनीच्या नावाने वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये पैसे जमा करण्यास सांगण्यात आले. या प्रकारात ५२०० आणि ५०४५.७ डॉलर इतकी रक्कम घेऊन भारतीय चलनात एकूण ८ लाख ८१ हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली. पुढील तपास चाकण उत्तर पोलिस करत आहेत.

## टोल वसुली मात्र जोमात

# महामार्गावर डागडुजी करून बोळवण

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**ओतूर :** अनेक दिवसांपासून यक्षप्रश्न ठरलेल्या अहिल्यानगर-कल्याण राष्ट्रीय महामार्गावरील खड्डे बुजविण्यासाठी केवळ डागडुजी करून प्रवाशांची बोळवण केली जात असल्याची भावना नागरिकांत व्यक्त होत आहे. संबंधित विभागाकडून वरचेवर खड्डे बुजवून उरकोगिरी केली जात असून कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात येत नसल्याने वाहनचालकांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे.

डुंबरवाडी ते ओतूर आणि ओतूर ते पिंपळगाव जोगा या दरम्यानचा सुमारे १५ किलोमीटरचा रस्ता ठिकठिकाणी उखडलेला आहे. या मार्गावर लहान-मोठे अपघात सातत्याने घडत असून काही गंभीर अपघातांमध्ये वाहनचालकांना आपला जीवही गमवावा लागला आहे. अनेक ठिकाणी रस्ता खचलेला असल्याने वाहनचालकांची मोठी डोकेदुखी ठरत आहे.

या महामार्गाचे काँक्रीटीकरणाचे काम सुरू असले तरी अनेक ठिकाणी काम ठप्प असल्याचे दिसून येत आहे. काम ठप्प राहण्यामागची कारणे काय, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. वाहनचालकांची दिशाभूल होऊन अपघात घडत असताना त्यास जबाबदार कोण, असा प्रश्नही निर्माण झाला आहे.

दरम्यान, अवघ्या काही किलोमीटर अंतरावर डुंबरवाडी टोल नाका असून परिसरात खड्ड्यांचे साम्राज्य असतानाही येथे टोल वसुली सुरू आहे. काम पूर्णत्वास न गेलेले असताना केली जाणारी टोल वसुली हा गंभीर प्रश्न असतानाही संबंधित यंत्रणेकडून याकडे दुर्लक्ष होत असल्याची टीका होत आहे. त्यामुळे प्रवासी व वाहनचालकांतून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

या रस्त्याचे काँक्रीटीकरणाचे काम तातडीने पूर्ण करण्यात यावे, अशी मागणी जोर धरत आहे. तसेच ओतूर, बनकरफाटा व डोंगरे या गावांलगत रस्ता दुभाजक करण्यात यावेत, जेणेकरून वाहतुकीचा प्रश्न निर्माण होणार नाही, अशी मागणीही स्थानिकांकडून करण्यात येत आहे. तात्पुरती डागडुजी करण्याऐवजी काँक्रीटीकरणाच्या कामाला प्रत्यक्ष गती द्यावी, अशी मागणी या भागातून होत आहे.

## भोईटेवस्ती येथे संत तुकाराम महाराज बीज सोहळा उत्साहात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**भवानीनगर :** भोईटेवस्ती (निंबोडी, ता. इंदापूर) येथे अखंड हरिनामाच्या गजरात गुलालाची उधळण व पुष्पवृष्टी करत श्री जगद्गुरु संत तुकाराम महाराज बीज सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. गेल्या ४८ वर्षांची परंपरा कायम राखत हा सोहळा भक्तीमय वातावरणात पार पडला.

संतश्रेष्ठ जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या ३७६ व्या वैकुंठगमन सोहळ्यानिमित्त टाळ, मृदुंग व वीणेच्या निनादात श्री तुकोबाराय गाथा पारायण व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन २६ फेब्रुवारी ते ५ मार्च या कालावधीत करण्यात आले होते. या सप्ताहानिमित्त २६ फेब्रुवारीपासून श्री तुकोबाराय गाथा पारायणाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ह.भ.प. शहाजी महाराज नरुटे (काइझड) यांचे दररोज भावार्थ रामायणावर प्रवचन झाले. ४ मार्च रोजी दिंडी व दीपप्रज्वलनाचा कार्यक्रम पार पडला.

सप्ताहादरम्यान ह.भ.प. बापूसाहेब महाराज ढगे, ह.भ.प. प्रवीण महाराज चौधरी, ह.भ.प. डॉ. सुहास महाराज फडतरे, ह.भ.प. सोहम महाराज देहूकर, ह.भ.प. सुभाष महाराज जाधव, ह.भ.प. श्यामसुंदर महाराज ढवळे तसेच ह.भ.प. मुरारी महाराज नामदास यांच्या कीर्तनांचे आयोजन करण्यात आले होते.

गुरुवारी ह.भ.प. भागवताचार्य नामदेव महाराज शास्त्री यांचे सकाळी दहा ते दुपारी बारा या वेळेत श्री संतश्रेष्ठ जगद्गुरु तुकाराम महाराज बीज फुलांचे व काल्याचे कीर्तन झाले. कीर्तनानंतर आयएएस अधिकारी डॉ. सागर दत्तात्रय डोईफोडे यांच्या हस्ते आरती करण्यात आली. त्यानंतर दुपारी बारा वाजता अखंड हरिनामाचा गजर झाला आणि भाविकांनी पुष्पवृष्टी करत बीज सोहळा उत्साहात साजरा केला.

या सोहळ्याचे आयोजन धर्मराज भोईटे, ह.भ.प. दत्तात्रय महाराज भोईटे तसेच हनुमान भजनी मंडळ भोईटेवस्ती (निंबोडी) यांच्या वतीने करण्यात आले होते.

## आंबेगाव 'सुपर २३' उपक्रमासाठी १२८ विद्यार्थ्यांच्या मुलाखती पूर्ण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** पंचायत समिती आंबेगाव शिक्षण विभाग आणि आयुका वेधशाळा गिरवली, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषद शाळांमधील इयत्ता सहावी व सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी 'धरतीवर इस्रो-नासा'च्या धर्तीवर राबविण्यात येत असलेल्या 'आंबेगाव सुपर २३' या अभिनव उपक्रमांतर्गत पहिल्या लेखी परीक्षेत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांच्या मुलाखती पंचायत समिती आंबेगाव येथे घेण्यात आल्या.

या उपक्रमाचे नियोजन पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्या प्रेरणेने तसेच शिक्षणाधिकारी संजय नाईकडे आणि गटविकास अधिकारी प्रमिला वाळुंज यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. तालुक्यातील इयत्ता सहावी व सातवीतील एकूण १२२९ विद्यार्थ्यांची इस्रो-नासाच्या धर्तीवर पहिली लेखी चाचणी पंचायत समिती आंबेगाव शिक्षण विभागाच्या वतीने घेण्यात आली होती. या चाचणीत पात्र ठरलेल्या १२८ विद्यार्थ्यांची मुलाखत घेण्यात आली असून त्यातून अंतिम टप्प्यात तालुक्यातील २३ विद्यार्थ्यांची 'आंबेगाव सुपर २३'मध्ये निवड करण्यात येणार आहे.

ग्रामीण व आदिवासी भागातील गुणवंत विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध करून देणे, त्यांच्यातील आत्मविश्वास वाढविणे, वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे, स्पर्धा परीक्षांबद्दलची आवड निर्माण करणे तसेच विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देणे हा या उपक्रमाचा उद्देश असल्याची माहिती गटशिक्षणाधिकारी रूपाली धोका यांनी दिली.

'आंबेगाव सुपर २३' हा उपक्रम स्तुत्य असून मुलाखतीसाठी आलेले विद्यार्थी अत्यंत चुणचुणीत आहेत. विज्ञान क्षेत्रात त्यांच्यासमोर अनेक संधी उपलब्ध आहेत. प्रत्येक घटनेमागील कार्यकारणभाव समजून घेत त्यांनी अभ्यास करावा, असे आवाहन आयुकाचे शास्त्रज्ञ निलेश पोखरकर यांनी केले. मुलाखत प्रक्रियेसाठी आयुकाच्या आठ टीम कार्यरत होत्या. विज्ञान प्रसार अधिकारी समीर धुरडे, वैज्ञानिक सहाय्यक निलेश पोखरकर, रुपेश लबडे, प्रसाद आडेकर, सुरेश कासार, प्रशांत शेटे, सागर शिवशरण आणि प्रणव काळे यांनी विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या.

या उपक्रमाचे पुणे जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष विवेक वळसेपाटील, पंचायत समिती सदस्य कैलासबुवा काळे, संजय गवारी, निलेश टेमकर तसेच गटविकास अधिकारी प्रमिला वाळुंज यांनी कौतुक करून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी नोडल अधिकारी शैला निमसे, विस्तार अधिकारी कल्पना टाकळकर, केंद्रप्रमुख रामभाऊ कोरडे, मच्छिंद्र काळे तसेच विशेष शिक्षक सैफ सय्यद यांनी विशेष परिश्रम घेतले.

# ४७ विद्यार्थ्यांचे बालगृहात पुनर्वसन

## आळंदीत मुलीच्या शोषणप्रकरणी वारकरी शिक्षण संस्था बंद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळंदी :** आळंदी येथील जाहूरकर वारकरी शिक्षण संस्थेत १२ वर्षीय मुलीचे शारीरिक व मानसिक शोषण झाल्याचा प्रकार उघडकीस आल्यानंतर आळंदी नगरपरिषद प्रशासनाने संस्थेवर कारवाई करत संस्था तात्काळ बंद केली आहे. या संस्थेत राहणाऱ्या एकूण ४७ विद्यार्थ्यांना सुरक्षिततेच्या दृष्टीने शासकीय मान्यता प्राप्त बालगृहात पुनर्वसनासाठी पाठविण्यात आले आहे. या घटनेमुळे आळंदी परिसरात संताप व्यक्त केला जात आहे.

आळंदी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी माधव खांडेकर यांच्या नेतृत्वाखाली नगरपरिषद अधिकारी, आळंदी पोलिसांच्या दामिणी महिला पथकाचे कर्मचारी तसेच जिल्हा बाल संरक्षण कक्षाच्या अधिकाऱ्यांनी संस्थेची प्रत्यक्ष पाहणी केली. या तपासणीदरम्यान संस्थेमध्ये अनेक गंभीर त्रुटी आढळून आल्याने संस्था



बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला.

जुन्या एस.टी. स्थानकाजवळ असलेल्या या वारकरी शिक्षण संस्थेत शालेय शिक्षणाबरोबरच वारकरी संप्रदायाचे अध्यात्मिक शिक्षण दिले जात होते. येथे राहणाऱ्या १२ वर्षीय मुलीवर शारीरिक व मानसिक शोषण झाल्याचा आरोप समोर आल्यानंतर या प्रकरणी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर नगरपरिषद प्रशासनाने तपासणी करून संस्थेवर कारवाई केली.

तपासणीदरम्यान संस्थेत विद्यार्थ्यांच्या प्रवेश अर्जांची नोंद, आधार कार्ड तपशील, पालकांची कागदपत्रे तसेच छाननी समिती अस्तित्वात नसल्याचे आढळले. नियमांनुसार आवश्यक कर्मचारी संख्या नव्हती. विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र अभ्यासिका, भोजन कक्ष यांची व्यवस्था नव्हती. स्वयंपाकघर आणि निवासाची जागा अपुरी होती तसेच पुरेशी व हवेशीर स्नानगृहे व स्वच्छतागृहेही नव्हती. भोजनासाठी निश्चित मेनू पत्रक नसल्याचेही समोर आले. काही विद्यार्थ्यांनी रात्रीचे शिल्लक अन्न सकाळी दिले जात असल्याची माहिती दिली. तसेच प्रवेश नोंद वही, प्रथमोपचार पेटी, तक्रार पेटी आणि नियमावलीचे फलकही संस्थेत नसल्याचे आढळले.

तपासणीत संस्थेकडे मुलांना निवासी ठेवण्यासाठी आवश्यक शासकीय परवानगी नसल्याचेही उघड झाले. महिला व बालविकास विभागाच्या ३ जुलै २०२५ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार अनधिकृत व नियमभंग करणाऱ्या संस्थांवर कारवाई करण्याचे अधिकार स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात आले आहेत. त्यानुसार मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी संस्थेला तात्काळ बंद करण्याचे आदेश दिले.

या संस्थेतील ४३ मुले आणि ४ मुलींना ज्ञानेश बालमंदिर, फुलगाव (मरकळ रोड), ज्ञानमंदिर बालगृह, नारकरवाडी (ता. आंबेगाव) आणि सह्याद्री बालगृह, पंकटिका (घोडेगाव रोड, मंचर) या तीन शासकीय मान्यता प्राप्त बालगृहात पुढील शिक्षणासाठी पाठविण्यात आले आहे.

या कारवाईत आळंदी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक भीमा नरके, नगरपरिषद अधिकारी सीमा चारभे, लेखापरीक्षक प्रदीप आवारी, सहाय्यक प्रकल्प अधिकारी वैशाली पाटील, अभियंता मिथिल पाटील, दामिणी पथकाच्या पूजा नाईक व श्वेता शेलकर, समुदाय संघटक अर्जुन घोडे, बाल संरक्षण अधिकारी शत्रुघ्न खोकले तसेच पोलिस कर्मचारी मच्छिंद्र शेंडे यांनी सहभाग घेतला.

## युद्धाची झळ; एलपीजी गॅसपुरवठा ठप्प




■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चाकण :** आखाती भागातील युद्धपरिस्थितीचा परिणाम आता स्थानिक पातळीवरही जाणवू लागला आहे. घरगुती एलपीजी गॅसचा पुरवठा सुरळीत राहावा यासाठी व्यावसायिक एलपीजी गॅस सिलिंडरचा पुरवठा शुक्रवारपासून बंद करण्यात आला आहे. त्यामुळे हॉटेल, कंपन्या आणि इतर व्यावसायिक आस्थापनांना मिळणारा गॅसपुरवठा ठप्प झाला असून उद्योग व व्यवसायांवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

चाकण येथील हिंदुस्थान पेट्रोलियम, शिक्रापूर येथील भारत पेट्रोलियम तसेच इंडियन ऑइल कॉर्पोरेशनकडून गॅसचा पुरवठा केला जातो. आखाती युद्धामुळे पुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेऊन पेट्रोलियम कंपन्यांनी व्यावसायिक एलपीजी गॅस वितरकांना तात्पुरता पुरवठा बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या उपलब्ध असलेला सिलिंडरचा साठा घरगुती ग्राहकांसाठी राखून ठेवण्यात आला आहे. शुक्रवारी वितरकांकडे शिल्लक असलेल्या व्यावसायिक सिलिंडरचे वाटप करण्यात आले. मात्र पुढील पुरवठा कधी सुरू होणार याबाबत स्पष्ट माहिती उपलब्ध नाही. घरगुती एलपीजी गॅस वितरण मात्र सध्या सुरळीत सुरू असल्याचे वितरकांनी सांगितले.

## महामार्ग विस्तार प्रकल्पांना गती?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चाकण :** पुणे परिसरात अनेक वर्षांपासून चर्चेत असलेल्या महामार्ग विस्तार प्रकल्पांना गती मिळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. वाहतूक कोंडी आणि प्रदूषण कमी करण्यासाठी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी अलीकडेच महत्त्वाचा कृती आराखडा जाहीर केला आहे.

पुणे आणि पश्चिम महाराष्ट्रातील सुमारे १ लाख १० हजार कोटी रुपयांच्या विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांची घोषणा करण्यात आली असून त्यापैकी सुमारे ४५ हजार कोटी रुपयांच्या चार प्रमुख प्रकल्पांचे भूमिपूजन येत्या महिन्यात करण्यात येणार आहे. यात पुणे-शिरूर, हडपसर-यवत, नाशिक फाटा-खेड तसेच तळेगाव-चाकण-शिक्रापूर या उन्नत मार्गांचा समावेश आहे. या प्रकल्पांना गती मिळाल्यास वाहतूक कोंडी कमी होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे

## शिवजयंतीनिमित्त शिवनेरी किल्ल्यावर उत्साहात सोहळा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जुन्नर :** किल्ले शिवनेरी येथे तिथीनुसार शिवजयंती सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरा करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज की जय, जय भवानी, जय शिवाजी या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. राज्यसभेच्या खासदार डॉ. मेघा कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडला.

या कार्यक्रमास शिवशंकर राजेंद्र स्वामी, शिवव्याख्याते सुधीर गाडे, नगराध्यक्षा सुजाता काजळे, शिवनेरी स्मारक समितीचे अध्यक्ष हेमंत मावळे, कार्याध्यक्ष मधुकर काजळे, चिटणीस रमेश कर्पे, चंद्रहास श्रोत्री, संदीप धानापुने, गोविंद हिंगे यांच्यासह मोठ्या संख्येने शिवभक्त व व्रतधारी उपस्थित होते.

कार्यक्रमात बोलताना खासदार डॉ. मेघा कुलकर्णी यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थळ असलेले शिवनेरी किल्ले हे



प्रेरणास्थान आहे. प्रत्येकाने भीती आणि आळस झटकून या पवित्र भूमीला वंदन करून प्रेरणा घ्यावी. शिवरायांनी स्वतःसाठी राज्याभिषेक केला नव्हता, तर ते एक योगीस्वरूप नेते होते, असे त्यांनी नमूद केले.

तिथीनुसार शिवजयंतीनिमित्त सकाळी सात वाजता शिवशंकर राजेंद्र स्वामी यांच्या हस्ते गडदेवता शिवाई मातेस अभिषेक करण्यात आला. यावेळी शिवाई देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष राजेंद्र भगत, बाजार समितीचे संचालक प्रकाश ताजने, सरपंच दत्तात्रेय ताजणे तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

यानंतर श्री शिवाई माता मंदिर ते शिवजन्मस्थळ असा छबिना व पालखी सोहळा काढण्यात आला. या मिरवणुकीत मोठ्या संख्येने शिवभक्त सहभागी झाले होते. शिवजन्मस्थळी मान्यवरांच्या हस्ते पाळणा जोजवून शिवजन्मसोहळा साजरा करण्यात आला. यावेळी शिवव्याख्याते सुधीर गाडे यांनी गडावर शिवव्याख्यान दिले. कबाडवाडी येथील महिला गटाने लेझीम खेळाचे प्रात्यक्षिक सादर केले, तर पाडळी येथील शौर्य पथकाने सादर केलेल्या मर्दानी खेळांच्या प्रात्यक्षिकांनी उपस्थितांची मने जिंकली.

## कांद्याच्या आवकेत वाढ; भाव स्थिर; एकूण उलाढाल ६ कोटी, १० लाख रुपये

# मिरची, बटाटा, लसुण व वाटाण्याची प्रचंड आवक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चाकण :** खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्ड मध्ये कांद्याच्या आवकेत वाढ होऊन भाव स्थिर राहिले. हिरवी मिरची, बटाटा, लसुण व वाटाण्याची प्रचंड आवक झाली. चवळी, कोबी, फ्लावर, दोडका, कारले, शेवगा व भेंडीचे भाव तेजीत राहिले. लसणाची भरपूर आवक झाली. चाकण येथील पालेभाज्यांच्या बाजारात कोथिंबीर, पालक व मेथीची उच्चांकी आवक होऊनही भाव कडाडले. एकूण उलाढाल ६ कोटी १० लाख रुपये झाली.

चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण ९ हजार क्विंटल आवक झाली. कांद्याला १,४०० रुपये भाव मिळाला. बटाट्याची एकूण आवक १,४०० क्विंटल झाली. बटाट्याला १,२०० रुपयांपर्यंत भाव मिळाला. हिरव्या मिरचीची एकूण आवक ३४५ क्विंटल झाली. हिरव्या मिरचीला ६ हजार रुपयांपासून ते ८,००० रुपयांपर्यंत भाव मिळाला.




कांद्याची व तरकारी मालाची झालेली आवक. ( छाया : अविनाश दुधवडे)

**शेतीमालाची आवक व बाजारभाव पुढीलप्रमाणे**

कांदा - एकूण आवक - ९,००० क्विंटल.भाव क्रमांक - १.१,४०० रुपये, भाव क्रमांक २.१,२०० रुपये, भाव क्रमांक ३. ८००. बटाटा - एकूण आवक - १,४०० क्विंटल, भाव क्रमांक १. १,२००,. भाव क्रमांक २. १,००० रुपये,. भाव क्रमांक ३. ८०० रुपये,.

**फळभाज्या -**

फळभाज्यांच्या बाजारात एकूण आवक क्विंटल मध्ये व प्रतीदहा किलोंसाठी मालाला मिळालेले भाव कंसात पुढील प्रमाणे -

टोमॅटो - ३२२ क्विंटल (१,००० ते १,६०० रू.), कोबी - २६५ क्विंटल (४०० ते ६०० रू.), फ्लॉवर - २२२ क्विंटल (८,००० ते १२,००० रु.), वांगी - ८२ क्विंटल (२,००० ते ३,००० रु.), भेंडी - ९२ क्विंटल (३,००० ते ४,००० रु.), दोडका - ५८ क्विंटल (३,००० ते ४,००० रु.), कारली - ६८ क्विंटल ( २,००० ते ३,००० रू.) दुधीभोपळा - ५५ क्विंटल (१,००० ते २,००० रु.), काकडी - १२२ क्विंटल (१,००० ते २,५०० रु.),फरशी - ५२ क्विंटल (२,००० ते ३,००० रु.), वालवड - ५४ क्विंटल (२,००० ते ५,००० रुपये), ढोबळी मिरची - १४८ क्विंटल (३,००० ते ४,००० रु.), चवळी - ४२ क्विंटल (२,००० ते ३,००० रु.), वाटाणा - ७५ क्विंटल (३,००० ते ४,००० रू. ), गाजर - १२० क्विंटल (१,५०० ते २,००० रु.), गवार - २८ क्विंटल ७,००० ते ९,००० रु. ), आद्रक - १५० क्विंटल ( ३,५०० ते ४,५०० रु. ).,

**पालेभाज्या**

चाकण येथील बाजारात पालेभाज्यांची एकूण आवक जुड्यांमध्ये व भाज्यांना मिळालेले भाव पुढीलप्रमाणे - मेथी - एकूण २१ हजार ३९२ जुड्या (५०० ते ८०० रुपये ), कोथिंबीर - एकूण ३२ हजार ९४१ जुड्या (५०० ते ८०० रुपये,), शेपू - एकूण ३ हजार ५७० जुड्या (६०० ते ९०० रुपये ), पालक - एकूण ३ हजार २९५ जुड्या (८,००० ते १२,००० रुपये),.

जनावरांच्या बाजारात विक्रीसाठी आलेल्या ५० जर्सी गाईंपैकी ३५ गाईंची विक्री झाली. ( १५,००० ते ७०,००० रु. ), ८५ बैलांपैकी ६० बैलांची विक्री झाली. ( १०,००० ते ४०,००० रु.), १४० म्हशीं पैकी ११० म्हशींची विक्री झाली. ( ३०,००० ते ८०,००० रु.), ९,५०० शेळ्यामेंढ्यापैकी ८ हजार शेळ्यांची विक्री झाली असून त्यांना २,००० रुपयांपासून ते १५ हजार रुपयांपर्यंत भाव मिळाला.

दैनिक राज्य लोकतंत्र



## सारांश वृत्त

### कलेक्शन एजंटकडून रोकड लुटली

**नवी दिल्ली:** ईशान्य दिल्लीतील खजुरी खास परिसरात मोटारसायकलवरून आलेल्या चार अज्ञात इसमांनी एका २७ वर्षीय कलेक्शन एजंटची रोख रक्कम असलेली बॅग लुटल्याचा आरोप आहे, अशी माहिती पोलिसांनी रविवारी दिली. पीडित अविनाश, जुना सीलमपूर येथील रहिवासी, चांदणी चौक परिसरातील एका भंगार विक्रेत्याकडे कलेक्शन एजंट म्हणून काम करतो.




### तामिळनाडूत महिला दिन उत्साहात

**चेन्नई :** तामिळनाडूमधील राजकीय नेते आणि कार्यकर्त्यांनी रविवारी आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या, ज्यामध्ये कायदेविषयक प्रतिनिधित्वापासून प्रत्यक्ष निर्णय घेण्याच्या अधिकारात संक्रमणावर लक्ष केंद्रित केले गेले. या संदेशांमध्ये राज्याच्या सामाजिक-आर्थिक प्रगतीमध्ये महिलांच्या मध्यवर्ती भूमिकेवर भर देण्यात आला होता, तर सुरक्षा आणि संरचनात्मक सुधारणांवरही भर देण्यात आला होता. मुख्यमंत्री एमके स्टॅलिन यांनी महिलांना जग चालवणारी शक्तिशाली शक्ती म्हणून वर्णन केले आणि लैंगिक समानतेसाठी त्यांच्या सरकारची वचनबद्धता अधोरेखित केली.



### आसाममध्ये ३.२५ कोटींचे हेरॉइन जप्त

**गुवाहाटी :** आसामच्या काचर जिल्ह्यात ३.२५ कोटी रुपयांचे हेरॉइन जप्त केल्यानंतर पाच जणांना अटक करण्यात आली, असे मुख्यमंत्री कार्यालयाने सांगितले. शनिवारी दोन वाहनांमधून अटक आणि अंमली पदार्थ जप्त करण्यात आले. सीएमओने एक्स वरील एका पोस्टमध्ये म्हटले आहे की, विशिष्ट गुप्त माहितीच्या आधारे कारवाई करत, कछार पोलिसांनी सिलचर-कलैन रोडवर दोन्ही वाहने रोखली.

### इराणमध्ये इंधन व वीज संकटाची भीती

# तेहरानच्या तेल साठ्यांवर भीषण हल्ला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**तेहरान :** मध्यपूर्वेतील तणाव अधिकच वाढवत इस्रायलने इराणची राजधानी तेहरानजवळील तेल साठवणूक केंद्रांवर मोठा हल्ला केला आहे. मीडिया अहवालांनुसार, या हल्ल्यात शहर-ए-रे रिफायनरी कॉम्प्लेक्ससह अनेक तेल टाक्यांना लक्ष्य करण्यात आले. हल्ल्यानंतर तेहरानमधील तेल साठवणूक सुविधांमधून मोठ्या ज्वाळा उसळताना दिसल्याचे सांगितले जात आहे. या कारवाईमुळे इराणमधील इंधन पुरवठा, वाहतूक व्यवस्था आणि वीज निर्मितीवर गंभीर परिणाम होण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.



इस्रायली सैन्याने तेहरानमधील इंधन साठवण सुविधांवर हल्ला केल्याची पुष्टी केली असून युद्धादरम्यान नागरी औद्योगिक सुविधेला लक्ष्य करण्याची ही पहिलीच वेळ असल्याचे मानले जात आहे. राजधानी आणि उत्तरेकडील प्रांतांना इंधन पुरवठा करणाऱ्या या महत्त्वाच्या सुविधांवरील हल्ल्यासाठी इराणच्या सरकारी माध्यमांनी अमेरिका आणि इस्रायलला जबाबदार धरले आहे.

दरम्यान, इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी युद्धाच्या पुढील टप्प्यात "अनेक आश्चर्यकारक कारवाया" करण्याचा इशारा दिला आहे. इराणमधील सत्ताधारी व्यवस्थेला अस्थिर करून राजकीय बदल घडवून आणणे हे इस्रायलचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

याचवेळी इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी अमेरिकेचे माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केलेली बिनशर्त आत्मसमर्पणाची मागणी फेटाळून लावली. "ही एक स्वप्ने आहेत, जी मागणी करणाऱ्यांनी त्यांच्या कबरीत घेऊन जावी," असे त्यांनी कठोर शब्दांत म्हटले.

संघर्ष वाढत असताना इराणकडून क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ले सुरूच आहेत. या हल्ल्यांमुळे दुबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरील उड्डाणे विस्कळीत झाली, सौदी अरेबियातील एका मोठ्या तेल सुविधेला लक्ष्य करण्यात आले आणि बहरीनमध्ये नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवावे लागले.

या संघर्षात आतापर्यंत इराणमध्ये किमान १,२३० जणांचा, लेबनॉनमध्ये २०० हून अधिक आणि इस्रायलमध्ये ११ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. तसेच सहा अमेरिकन सैनिकांचाही मृत्यू झाल्याचे वृत्त आहे.

दरम्यान, कतारचे ऊर्जामंत्री साद अल-काबी यांनी युद्धामुळे जागतिक अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम होऊ शकतो, असा इशारा दिला आहे. त्यांच्या मते, संघर्ष आणखी वाढल्यास तेलाचे दर प्रति बॅरल १५० डॉलरपर्यंत जाऊ शकतात, ज्यामुळे जगभरातील अर्थव्यवस्था मोठ्या संकटात सापडू शकतात.

## इराणचा दावा : अनेक अमेरिकी सैनिक कैद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**तेहरान :** इराणच्या सर्वोच्च राष्ट्रीय सुरक्षा परिषदेचे सचिव अली लारीजानी यांनी दावा केला आहे की अलीकडील संघर्षादरम्यान इराणी सैन्याने अनेक अमेरिकन सैनिकांना कैद केले आहे. रविवारी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट करत त्यांनी म्हटले की त्यांना अनेक अमेरिकन सैनिकांना ताब्यात घेतल्याची माहिती मिळाली आहे. अमेरिका युद्धात हे सैनिक मारले गेल्याचा दावा करत असली तरी हे सत्य जास्त काळ लपवता येणार नाही, असा आरोपही त्यांनी केला.

गेल्या महिन्याच्या अखेरीस अमेरिका आणि इस्रायलने इराणवर हल्ले सुरू केल्यापासून या प्रदेशातील संघर्ष अधिकच तीव्र झाला आहे. त्याला प्रत्युत्तर म्हणून इराणच्या सशस्त्र दलांनी, विशेषतः इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सने शेकडो बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे आणि ड्रोनद्वारे प्रतिहल्ले केले असून अनेक संवेदनशील ठिकाणांना लक्ष्य करण्यात आले आहे.

एक दिवस आधीही लारीजानी यांनी अमेरिकेला इशारा देत म्हटले होते की इराणचा संयम संपुष्टात आणण्याचे आणि आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन करण्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील. राष्ट्रीय दृढनिश्चयाच्या आधारे इराण अमेरिकेच्या आक्रमकतेला अनुत्तरित सोडणार नाही आणि त्याला जबाबदार धरेल, असे त्यांनी स्पष्ट केले. लारीजानी यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या वक्तव्यावर टीका करत म्हटले की त्यातून इराणविरुद्ध अमेरिकेची व्यापक रणनीती अपयशी ठरल्याचे दिसून येते. इराणमधील राजवट कमकुवत करणे आणि देशातील राष्ट्रीय एकता खंडित करणे हे अमेरिकेचे उद्दिष्ट होते, मात्र ते साध्य झाले नाही, असे ते म्हणाले.

दरम्यान, दक्षिणेकडील समुद्री जल शुद्धीकरण प्रकल्पावर झालेल्या हल्ल्यानंतर इराणने अमेरिकेच्या लष्करी तळावर क्षेपणास्त्र हल्ला केल्याचा दावा केला आहे. बहरीनमधील अमेरिकन नौदलाच्या नेव्हल सपोर्ट ॲक्टिव्हिटी बहरीन तळावरून कथित हल्ला झाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली.

## खामेनींच्या हत्येचा बदला घेऊ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**तेहरान :** इराणचे सुरक्षा प्रमुख अली लारीजानी यांनी रविवारी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना थेट इशारा देत माजी सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या हत्येची किंमत चुकवावी लागेल, असे म्हटले. खामेनी यांचे जवळचे विश्वासू मानले जाणारे लारीजानी यांनी इंस्टाग्रामवर पोस्ट करत "आम्ही आमच्या नेत्याच्या आणि आमच्या लोकांच्या रक्ताचा अथकपणे बदला घेऊ. ट्रम्प यांना याची किंमत चुकवावी लागेल," असा इशारा दिला.

२८ फेब्रुवारी रोजी अमेरिका आणि इस्रायलने संयुक्तपणे इराणची राजधानी तेहरानवर हल्ले केल्यानंतर या युद्धाला सुरुवात झाली. या हल्ल्यांमध्ये अयातुल्ला अली खामेनी यांच्यासह अनेक जणांचा मृत्यू झाला. त्यानंतर इराणने आखाती देशांवर क्षेपणास्त्रे आणि ड्रोन हल्ले सुरू केले असून दुबई, बहरीन, कुवेत आणि कतारसह अनेक ठिकाणी मोठे नुकसान झाल्याची माहिती आहे. तसेच इराणने अनेक अमेरिकन लष्करी तळांवरही हल्ले केल्याचा दावा केला आहे.

लारीजानी यांच्या धमकीला प्रत्युत्तर देताना डोनाल्ड ट्रम्प यांनी ती फेटाळून लावली. "तो कशाबद्दल बोलत आहे, तो कोण आहे हे मला माहित नाही. मला त्याची काही पर्वा नाही," असे ट्रम्प यांनी सीबीएस न्यूजला सांगितले. त्यांनी इराणवरचे अमेरिकेचे हल्ले सुरूच राहतील आणि तेहरानने बिनशर्त आत्मसमर्पण करावे, अशी मागणीही केली.

लारीजानी यांनी इराणच्या शेजारील देशांनाही इशारा दिला. त्यांनी म्हटले की या देशांनी अमेरिकेला त्यांच्या भूभागाचा वापर इराणविरुद्ध करण्यापासून रोखले पाहिजे, अन्यथा इराणकडे स्वतः कारवाई करण्याशिवाय पर्याय राहणार नाही. त्यामुळे मध्यपूर्वेतील तणाव आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## इस्फहान विमानतळावर इस्रायलचा बॉम्बहल्ला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**तेहरान :** इराण आणि अमेरिका-इस्रायल युतीमधील सुरू असलेले युद्ध आता अधिकच भीषण टप्प्यात पोहोचले आहे. शनिवारी इस्रायली संरक्षण दलाने दावा केला की तेहराननंतर त्यांनी इराणच्या इस्फहान शहरातील सामरिकदृष्ट्या महत्त्वाच्या विमानतळावर मोठा हल्ला केला. या बॉम्बहल्ल्यात इराणच्या हवाई दलातील अभिमान मानली जाणारी अनेक एफ-१४ लढाऊ विमाने जमिनीवरच नष्ट झाल्याचे सांगितले जात आहे.

इराणी वृत्तसंस्था तस्निमच्या माहितीनुसार, इस्रायली आणि अमेरिकन युद्धविमानांनी इस्फहान प्रांतातील किमान आठ शहरांवर हल्ले केले. नजफाबाद, अरन, बिदगोल, बरखार, खोमेनी शहर, शहरेझा, फलावर्जान आणि मुबारकेह या शहरांना लक्ष्य करण्यात आले. या हल्ल्यांमध्ये किमान ११ जणांचा मृत्यू झाल्याची पुष्टी झाली आहे.

हल्ल्यांदरम्यान लढाऊ विमानांनी केवळ लष्करी तळांवरच नव्हे तर काही उत्पादन कार्यशाळा आणि घोडेस्वारी क्लबवरही क्षेपणास्त्रे डागल्याचे वृत्त आहे. राजधानी तेहरान आणि अल्बोर्झ प्रांतातील तेल डेपोंवर हल्ला झाल्याने किमान चार टँकर चालकांचा मृत्यू झाला. इस्फहान हे शहर इराणच्या अणुऊर्जा कार्यक्रमासाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. ॲक्सिओसच्या एका अहवालानुसार, अमेरिका आणि इस्रायल आता इराणमध्ये विशेष सैन्य पाठवण्याचा विचार करत आहेत. या संभाव्य गुप्त कारवाईचा उद्देश इराणच्या अत्यंत समृद्ध युरेनियम साठ्यावर नियंत्रण मिळवणे असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, इराण पूर्णपणे प्रत्युत्तर देण्याच्या स्थितीत नाही याची खात्री झाल्यानंतरच हा टप्पा राबवला जाऊ शकतो, असेही अहवालात नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, आयडीएफने टेलिग्रामवर प्रसिद्ध केलेल्या निवेदनात सांगितले की विमानतळासोबतच त्यांच्या विमानांसाठी धोका ठरू शकणाऱ्या शोध प्रणाली आणि हवाई संरक्षण यंत्रणाही नष्ट करण्यात आल्या. शुक्रवारी तेहरानच्या मेहराबाद विमानतळावर झालेल्या हल्ल्यानंतर ही कारवाई करण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

तेल साठ्यांवर झालेल्या हल्ल्यांमुळे जगभरातील इंधन पुरवठा आणि वाहतूक व्यवस्थेवर परिणाम होत आहे. इराणने संयुक्त अरब अमिरातीतील अमेरिकन लष्करी तळांवर क्षेपणास्त्रे डागल्याचे वृत्त असून, आखाती प्रदेशही आता युद्धाच्या ज्वाळांनी वेढला गेला आहे.

## नितीश कुमार यांचे पुत्र निशांत कुमार जेडीयूमध्ये

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पाटणा :** बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांचे पुत्र निशांत कुमार यांनी रविवारी पाटणा येथील पक्षाच्या मुख्यालयात जनता दल (युनायटेड) मध्ये औपचारिक प्रवेश केला. अनेक वर्षे सार्वजनिक जीवनापासून दूर राहिल्यानंतर त्यांनी बिहारच्या राजकारणात अधिकृत पाऊल ठेवले.



पक्षाच्या मुख्यालयात झालेल्या कार्यक्रमात केंद्रीय मंत्री राजीव रंजन सिंह, बिहारचे उपमुख्यमंत्री विजय कुमार चौधरी तसेच इतर वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत निशांत कुमार यांनी संजय झा यांच्या हस्ते पक्षाचे सदस्यत्व स्वीकारले. या प्रवेश सोहळ्यास मोठ्या संख्येने जेडीयूचे कार्यकर्ते उपस्थित होते. नितीश कुमार यांनी नुकताच राज्यसभेसाठी उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर काही दिवसांतच निशांत कुमार यांनी पक्षात प्रवेश केल्याने जेडीयूमध्ये पिढ्यांमधील नेतृत्व बदलाची चर्चा सुरू झाली आहे.

निशांत कुमार पक्ष कार्यालयात पोहोचताच कार्यकर्त्यांनी "युवा सोच, मजबूत संकल्प" अशा घोषणा देत त्यांचे स्वागत केले. त्यांच्या प्रवेशामुळे पक्षाच्या युवा-केंद्रित धोरणांना अधिक बळ मिळेल, अशी अपेक्षा कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.

### केंद्र सरकारने बजावली नोटीस

## बंगाल सरकारने स्पष्टीकरण द्यावे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** पश्चिम बंगालमध्ये राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या कार्यक्रमादरम्यान प्रोटोकॉलचे उल्लंघन झाल्याच्या वादानंतर केंद्र सरकारने राज्य सरकारकडून स्पष्टीकरण मागितले आहे. केंद्रीय गृहसचिवांनी पश्चिम बंगालच्या मुख्य सचिवांना पत्र पाठवून प्रोटोकॉल, स्थळ आणि मार्ग व्यवस्थेशी संबंधित 'ब्लू बुक' नियमांचे उल्लंघन झाल्याबाबत रविवारी सायंकाळी पाच वाजेपर्यंत उत्तर देण्यास सांगितले असल्याची माहिती सूत्रांनी दिली.





'ब्लू बुक' हा गोपनीय दस्तऐवज असून त्यामध्ये राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान तसेच त्यांच्या कुटुंबीयांच्या सुरक्षेशी संबंधित नियम आणि प्रोटोकॉल नमूद केलेले असतात. या नियमांचे पालन न झाल्याचा आरोप केंद्राकडून करण्यात आला आहे.

शनिवारी दार्जिलिंग जिल्ह्यातील बागडोगरा विमानतळाजवळ आयोजित आदिवासी समुदायाच्या कार्यक्रमात कमी उपस्थिती आणि कार्यक्रमाचे ठिकाण बदलल्याबद्दल राष्ट्रपती मुर्मू यांनी नाराजी व्यक्त केली होती. सिलिगुडीतील विधाननगर येथे होणारा हा कार्यक्रम प्रशासनाने सुरक्षा व अन्य कारणांमुळे गोशाईपूर येथे हलवला होता.

सूत्रांच्या माहितीनुसार, राष्ट्रपतींच्या स्वागतासाठी मुख्यमंत्री, मुख्य सचिव आणि पोलिस महासंचालक उपस्थित नसल्याबद्दलही केंद्राने स्पष्टीकरण मागितले आहे. प्रोटोकॉलनुसार राष्ट्रपतींच्या स्वागतासाठी राज्यातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणे अपेक्षित असते. मात्र या वेळी फक्त सिलिगुडीचे महापौर गौतम देब उपस्थित होते.

याशिवाय राष्ट्रपतींसाठी उभारलेल्या स्वच्छतागृहात पाणी नसल्याची बाब, तसेच त्यांच्या मार्गावर कचरा असल्याच्या तक्रारींचीही दखल घेण्यात आली आहे. या सर्व बाबींवर राज्य सरकारने स्पष्टीकरण द्यावे, असे पत्रात नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, या घटनेवरून राजकीय वातावरणही तापले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पश्चिम बंगाल सरकारवर राष्ट्रपतींचा अपमान केल्याचा आरोप करत ही घटना "लज्जास्पद आणि अभूतपूर्व" असल्याचे म्हटले आहे. तर मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी भाजप आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रपतींचा वापर करून राज्य सरकारला लक्ष्य करत असल्याचा आरोप केला आहे.

## सेवा क्षेत्रामुळे झपाट्याने आर्थिक वाढ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** गेल्या काही दशकांत भारताच्या अर्थव्यवस्थेच्या वाढीत सेवा क्षेत्राची मोठी भूमिका राहिली आहे. सुरुवातीला कमी खर्चाच्या बॅक ऑफिस सेवा आणि पाश्चात्य कंपन्यांसाठी सल्लागार सेवा देणाऱ्या केंद्रांमुळे ही वाढ झाली. मात्र गेल्या दशकात या क्षेत्राचे स्वरूप बदलले असून आता आयटी, डेटा विश्लेषण, नवोपक्रम आणि डिझाइनसारख्या उच्च कौशल्याधारित कामांवर भर देणारी केंद्रे मोठ्या प्रमाणात उभी राहिली आहेत.

अमेझॉनचे जगातील सर्वात मोठे कार्यालय सध्या दक्षिण भारतात असून जेपी मॉर्गनसारख्या आघाडीच्या वित्तीय संस्थांच्या सुमारे २० टक्के कर्मचाऱ्यांची नियुक्ती भारतीय शहरांमध्ये आहे. सरकारच्या माहितीनुसार, जगातील सुमारे पाचव्या भागातील चिप डिझाइन अभियंते भारतात कार्यरत आहेत. क्वालकॉम आणि मीडियाटेकसारख्या कंपन्यांमुळे या क्षेत्राला चालना मिळाली आहे. या वाढीमुळे भारत २०२१ पासून जगातील सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था म्हणून ओळखला जात आहे. पायाभूत सुविधांमध्ये झालेली मोठी गुंतवणूक, महामार्ग, विमानतळ आणि बंदरांच्या उभारणीमुळेही अर्थव्यवस्थेला गती मिळाली आहे. परिणामी गरिबीचे प्रमाणही कमी झाले असून जागतिक बँकेच्या अंदाजानुसार दररोज ४.२० डॉलर्सपेक्षा कमी उत्पन्नावर जगणाऱ्यांचे प्रमाण २०११-१२ मधील ५७.७ टक्क्यांवरून २०२२-२३ मध्ये २३.९ टक्क्यांपर्यंत घसरले आहे.

तथापि, तज्ज्ञांच्या मते या वाढीचे फायदे सर्वांपर्यंत समान पोहोचलेले नाहीत. भारतातील जवळपास अर्धी लोकसंख्या अजूनही शेतीवर अवलंबून असून दरडोई उत्पन्न अनेक विकसित देशांच्या तुलनेत खूपच कमी आहे. अर्थतज्ज्ञांच्या मते उच्च उत्पन्न गाठण्यासाठी भारताला पुढील दोन दशकांत दरवर्षी सुमारे ८ टक्के आर्थिक वाढ कायम राखावी लागेल.

तसेच दरवर्षी रोजगार बाजारात प्रवेश करणाऱ्या लाखो तरुणांसाठी दर्जेदार नोकऱ्या निर्माण करणे हे मोठे आव्हान आहे. उत्पादन क्षेत्राचा विस्तार आणि ग्रामीण भागातील रोजगारनिर्मिती वाढविणे ही आगामी काळातील अर्थव्यवस्थेसमोरील प्रमुख गरज असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

### महिला उद्योजकांमुळेच आर्थिक सक्षमीकरण

**अमरावती :** आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन चंद्राबाबू नायडू यांनी रविवारी सांगितले की, राज्यातील आर्थिक सक्षमीकरण मजबूत करण्यात महिला उद्योजक महत्त्वाची भूमिका बजावतील. येथील अमरावती परेड ग्राउंडवर आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या समारंभाला संबोधित करताना मुख्यमंत्र्यांनी देशभरातील महिलांना शुभेच्छा दिल्या आणि त्यांना कठोर परिश्रम, प्रेम आणि त्यागाचे मूर्त स्वरूप म्हणून वर्णन केले. तसेच त्यांच्या उन्नतीसाठी प्रयत्न करू असेही त्यांनी सांगितले.

## तरुणीवर बलात्काराचा प्रयत्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**डेहराडून :** दिल्लीहून एकटी सहलीसाठी आलेल्या तरुणीवर नैनीतालमध्ये टॅक्सी चालकाने बलात्काराचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. जीव वाचवण्यासाठी संबंधित तरुणीला जखमी अवस्थेत रात्रभर घनदाट जंगलात लपून बसावे लागल्याची माहिती पोलिसांनी दिली.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित तरुणी दिल्लीहून डेहराडूनमार्गे काठगोदाम येथे पोहोचली होती. तेथून नैनीतालला जाण्यासाठी तिने एक टॅक्सी भाड्याने घेतली. मात्र मध्यरात्री सुमारे १ वाजून ३० मिनिटांच्या सुमारास चालकाने टॅक्सी मुख्य रस्त्यावरून पटवा डांगर परिसरातील निर्जन रस्त्याकडे वळवली. यावर तरुणीने आक्षेप घेतल्यावर चालकाने तिच्याशी शिवीगाळ करत मारहाण केली. त्यानंतर तिचा मोबाईल हिसकावून घेत अपहरण करून तिच्यावर बलात्काराचा प्रयत्न केला. या वेळी प्रसंगावधान राखत तरुणीने टॅक्सीतून उतरून जवळील जंगलात पळ काढला. मोबाईल नसल्यामुळे कोणाशीही संपर्क साधता येत नव्हता. त्यामुळे ती जखमी अवस्थेत संपूर्ण रात्र जंगलात लपून बसली. शुक्रवारी सकाळी तिने कसेबसे पटवा डांगर गाव गाठले आणि स्थानिकांच्या मदतीने पोलिसांत तक्रार दाखल केली.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ तपास सुरू केला. पोलिसांनी दीपक सिंह बोरा (वय ३९, रा. हल्द्वानी) याला अटक केली. पोलिसांनी आरोपीकडून पीडितेचा मोबाईल जप्त केला.

### मध्यपूर्वेतील तणावाच्या पार्श्वभूमीवर

# भारताची कच्च्या तेलासाठी पर्यायी स्रोतांची तयारी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** मध्यपूर्वेतील वाढत्या तणावामुळे कच्च्या तेलाच्या पुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेऊन भारतीय रिफायनरी कंपन्यांनी अमेरिका, रशिया आणि पश्चिम आफ्रिका येथून अतिरिक्त कच्च्या तेलाच्या खरेदीसाठी वाटाघाटी सुरू केल्या आहेत. दीर्घकाळ संघर्ष सुरू राहिल्यास देशातील पुरवठा अखंड राहावा यासाठी ही तयारी केली जात असल्याची माहिती उद्योग क्षेत्रातील अधिकाऱ्यांनी दिली.



रिफायनरी कंपन्यांनी नियोजित देखभाल बंदी पुढे ढकलून सध्या नियमित प्रक्रिया दर कायम ठेवले आहेत. त्यामुळे देशाच्या गरजांसाठी आवश्यक इंधनाचा बफर साठा तयार करण्याचा प्रयत्न सुरू आहे. भारत आपल्या गरजेच्या सुमारे ८८ टक्के कच्च्या तेलाची आयात करतो आणि त्यातील जवळपास निम्मा पुरवठा होर्मुझच्या सामुद्रधुनीतून येतो.

अमेरिका आणि इस्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यांनंतर तसेच इराणने दिलेल्या प्रत्युत्तरामुळे या भागात तणाव वाढला आहे. या परिस्थितीमुळे होर्मुझ सामुद्रधुनीतून जाणाऱ्या तेलवाहू जहाजांच्या वाहतुकीवर परिणाम झाला आहे. त्यामुळे भारताने संघर्षमुक्त प्रदेशांमधून अधिक तेल खरेदी करण्यावर भर दिला आहे.

सरकारी सूत्रांच्या माहितीनुसार, २०२५ मध्ये सामुद्रधुनीबाहेरील स्रोतांमधून ६० टक्के पुरवठा होत होता, जो सध्या वाढून सुमारे ७० टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. भारतीय कंपन्या पश्चिम आफ्रिका, लॅटिन अमेरिका आणि अमेरिकेतूनही कच्च्या तेलाची खरेदी वाढवत आहेत.

देशात सध्या सुमारे १४४ दशलक्ष बॅरल कच्च्या तेलाचा साठा उपलब्ध असून तो सुमारे ३० दिवसांच्या आयातीसाठी पुरेसा आहे. तसेच धोरणात्मक पेट्रोलियम साठा आणि सरकारी कंपन्यांच्या साठ्यांसह एकूण साठवण क्षमता जवळपास ७४ दिवसांच्या आयातीइतकी असल्याचे पेट्रोलियम मंत्रालयाच्या आकडेवारीवरून स्पष्ट होते.

मात्र कच्च्या तेलाच्या वाढत्या किमती, मालवाहतूक आणि विमा प्रीमियम वाढल्यामुळे भारताच्या आयात खर्चात वाढ होण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

अमेरिका-इस्रायलच्या हल्ल्यानंतर आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाची किंमत प्रति बॅरल ७० डॉलरवरून ९२ डॉलरपर्यंत पोहोचली आहे. त्यामुळे आयात बिल वाढण्याबरोबरच रुपयावरही दबाव येऊ शकतो, असे विश्लेषकांचे मत आहे.